# माणूस

१ एप्रिल १९७२ पन्नास पैसे

## एक एप्रिल
¤
## काही खास वार्ता

- ¤ १ एप्रिलपासून साखर पन्नास पैसे किलो
- ¤ राजेश खन्ना व शेख अब्दुल्ला केंद्रीय मंत्रिमंडळात
- ¤ देशव्यापी दारूबंदी व सिगरेटबंदी
- ¤ १७५० रुपयात छोटी मोटार
- ¤ गहाळ पेपर्समुळे यंदा मे मध्ये पुन्हा एस. एस. सी. परीक्षा
- ¤ पॅरीसचा एफिल टॉवर ग्रीसच्या कंपनीने विकत घेतला

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | १ एप्रिल १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | पंचेचाळीस | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

## माणूस वर्गणीदारांसाठी अभिनव भेट

१ एप्रिल १९७२

माणूसच्या सल्लामी / रुपया / वार्षिक वर्गणीदारांसाठी या अंकात मध्यभागी (पृष्ठ ३२-३३ वर) एक सप्रेम-भेट कुपन जोडण्यात आले आहे. प्रत्येक कुपनवर क्रमांक आहे. ज्या वर्गणीदारांचा कुपन क्रमांक विषम असेल त्यांनी आपले कुपन १० एप्रिलपूर्वी कार्यालयात समक्ष आणून दिल्यास त्यांना राजहंस प्रकाशनाची १०० रुपये किंमतीची पुस्तके सप्रेम भेट देण्यात येतील.

—व्यवस्थापक

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

## एप्रिल फूल एप्रिल फूल एप्रिल फूल एप्रिल फूल एप्रि

- १ एप्रिलपासून साखर पन्नास पैसे किलो
- राजेश खन्ना व शेख अब्दुला केंद्रीय मंत्रिमंडळात
- देशव्यापी दारूबंदी व सिगरेटबंदी
- १७५० रुपयात छोटी मोटार
- गहाळ पेपर्समुळे यंदा मे मध्ये पुन्हा एस. एस. सी. परीक्षा

?

# पॅरिसचा एफिल टॉवर ग्रीसच्या

एप्रिलच्या पहिल्याच तारखेला मित्रमंडळींना आणि नातेवाईक वगैरेंना मूर्ख बनविण्याची ही प्रथा फारच जुनी आहे. ही प्रथा कोणी सुरू केली हे सांगणे कठीण आहे. परंतु ही प्रथा पूर्वीपासूनच सुरू आहे. काहींचे म्हणणे असे आहे, की ह्या दिवशी कोण्या थट्टेखोर माणसाने आपल्या मित्राची थट्टा केली असेल व त्या दिवसापासून ही प्रथा अंमलात आली असेल. एप्रिल फूलच्या ह्या दिवसाला स्कॉटलंडमध्ये ' ककू डे ', फ्रान्समध्य ' डिश डे ', जपानमध्ये ' डॉल डे ' व स्पेनमध्ये ' बॉल डे ' म्हणून संबोधण्यात येते.

काहीही असो, पण एप्रिल महिन्याचा पहिला दिवस आता थट्टामस्करी आणि आनंदाचा बनला आहे. त्या दिवशी कोणीही व्यक्ती मनाला वाटेल त्या माणसाची मस्करी करू शकते. या दिवशीच घडलेली ही रोमांचक, अद्वितीय आणि विस्मय-जनक घटना.

एका सकाळी पॅरिसच्या प्रसिद्ध दैनिकात मधल्या पानावर खालील समाचार झळकत होता.

पॅरिसचा प्राणप्रिय एफिल टॉवर आज रोजी फ्रान्सकडून ग्रीसच्या एका कंपनीने खरेदी करून घेतला आहे. या ९८५ फूट गगनचुंबी टॉवरचे सुटे भाग करून त्याला जहाजातून ग्रीसमध्ये घेऊन जाण्यात येईल व ग्रीसमधील अथेन्स शहराच्या मध्य-भागी या टॉवराला पुन्हा उभे करण्यात येईल. टॉवर तोडण्याचे काम आजपासून सुरू झाले आहे. सरकारने हा टॉवर कशासाठी विकला त्याचे कारण अज्ञात आहे. मोठ्या अक्षरांत लिहिलेला हा समाचार ज्यांनी वाचला त्यांना आश्चर्याचा धक्काच

बसला आणि ते क्रोधाने पेटून उठले. 'एफिल टॉवर म्हणजे फ्रान्स आणि फ्रान्स म्हणजे एफिल टॉवर. एफिल टॉवर ह्या ऐतिहासिक इमारतीची विक्री कशी होऊ शकेल? कारण हा टॉवर म्हणजे फ्रान्सचे नाक!'

बघता बघता हा समाचार गवताच्या गंजीस लागलेल्या आगीप्रमाणे फ्रान्सभर फैलावला. सरकारने एफिल टॉवर विकून टाकला हे वृत्त वाचून विरोधी पक्षाचे एक शिष्टमंडळ त्याचा खुलासा मागण्यासाठी गृहमंत्र्यांकडे जाऊन पोचले. कित्येक पॅरिसवासी टॉवरचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी त्या दिशेकडे निघाले. कित्येक टॉवर कशा रीतीने मोडण्यात येईल हे बघण्यासाठी त्या जागेकडे निघाले. कारण टॉवर तयार करण्यासाठी पंचवीस लाख नट-बोल्टांचा उपयोग करण्यात आला आहे.

एका कॉलेजातील (पॅरिस) संतप्त झालेल्या कॉलेजकुमारांनी टॉवरचे भाग घेऊन जाणारे जहाज बुडवून टाकण्याचा प्लॅन रचला.

# कंपनीने विकत घेतला ???

ही सर्व धावपळ त्या दिवसाच्या दुपारपर्यंत चालली आणि त्यानंतर त्याच दैनिकाची सायंआवृत्ती प्रसिद्ध झाली. तीत लिहिले होते, की आज एफिल टॉवर विकल्याविषयी प्रसिद्ध झालेली बातमी हा 'एप्रिल फूल'चा प्रकार आहे. आज एप्रिलची पहिली तारीख असल्यामुळे ग्रीसचे प्रसिद्ध लखपती ॲरिस्टॉटल ॲनि-सिनिसो यांनी आमच्या दैनिकाचे मधले पान या समाचारासाठी विकत घेतले होते. सर्वांना 'एप्रिल फूल' केल्याबद्दल आम्ही जबाबदार नसून ॲरिस्टॉटल ॲनिसिनिसो जबाबदार आहेत.

ॲरिस्टॉटल ॲनिसिनिसो त्यावेळी अथेन्समध्ये होते आणि फ्रान्समधील नाग-रिकांच्या मूर्खपणावर मनसोक्त हसत होते. एप्रिल फूलची ही युक्ती त्यांना फार महागात पडली. कारण ती जाहिरात त्या दैनिकात प्रसिद्ध करण्यासाठी त्यांना रु. ६३,००० इतका खर्च आला होता. परंतु त्याची त्यांना खंत नव्हती. फ्रान्सच्या नागरिकांना 'एप्रिल फूल' केले ह्या गोष्टीचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर विलसत होता.

फ्रेंच मूर्ख कसे बनले. काहींनी तर सकाळचा ब्रेकफास्टही केला नाही. काहींनी तर त्या दिवशी उपासच केला व एके ठिकाणी विवाहकार्य सुरू होते त्या ठिकाणचे सर्व लोक आनंदात न दिसता कोणी जवळचा नातेवाईकच मृत्यू पावला आहे अशा दुःखाने भारावलेले दिसत होते. यावरून कल्पना करा, की फ्रान्सला एफिल टॉवर किती प्रिय आहे.

**धनराज मराठे**

# कार्यकर्त्यांची सत्वपरीक्षा

## १ : मुक्काम जुवाणे : ता. शहादे

दि. २२ मार्च १९७२ रोजी सकाळीं आठ वाजता जुवाणे गावच्या सव्वीस मजुरांबरोबर ग्रामस्वराज्य-समितीचा एक कार्यकर्ता करडे गावी जाण्यास निघाला. जुवाणे गावाच्या एकूण पस्तीस मजुरांनी कुत्र्या हकमन पावरा या करडें गावी रहाणाऱ्या जमीनदाराकडे दादर कापणीचे काम एक महिन्यापूर्वी केले होते. त्याचीं मजुरी ठरल्याप्रमाणे देण्यास कुत्र्या हकमनने अमान्य केल्याने मजुरांनी कमी मजुरी घेण्याचे नाकारले. चारपाच वेळा खेपा घालूनही ठरलेली मजुरी देण्याचे कुत्र्या पावराने नाकारले. काय करावे याबद्दल हताश होऊन गेलेल्या मजुरांना कार्यकर्त्याने सत्याग्रहाचा मार्ग सुचविला. सर्व मजुरांनी एकमताने सत्याग्रह करण्याचे ठरविले.

पावणे नऊच्या सुमारास करडे येथे कुत्र्या पावराच्या घरासमोर सत्याग्रही शांतपणे बसले. मजुरांपैकी सुऱ्या गुल्या याने झालेला व ठरलेला व्यवहार कुत्र्यास सांगितला. कुत्र्या व त्याची पाच जवान पोरे यांनी मजुरांना व कार्यकर्त्याला दम देण्यास सुरुवात केली व ठरलेली मजुरी देण्याचे नाकारले. 'जोपर्यंत ठरल्याप्रमाणे मजुरी मिळत नाही तोपर्यंत आम्ही इथेच बसून राहणार. एक वर्षभर इथेच बसावे लागले तरी बसू, पण मजुरी मिळाल्याशिवाय हलणार नाही' असे सत्याग्रह करणाऱ्यांनी कुत्र्यास सांगितले. कुत्र्याने व त्याच्या मुलांनी आपापसात बोलणे करून अखेर ठरल्याप्रमाणे मजुरीचे धान्य दिले. दिलेल्या धान्याची गाठोडी बांधून मजूर जुवाणीस परतण्याच्या तयारीत होते.

कार्यकर्त्याने आपल्या वहीत घडत असलेल्या घटनेची माहिती लिहिली. कुत्र्याच्या मुलांनी ती वही हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला व तोंडाने शिवीगाळ सुरू केली. वही देण्यास कार्यकर्त्याने विरोध केला. कुत्र्याच्या पाची मुलांनी कार्यकर्त्याला शिव्या देत फटाफट मारण्यास सुरुवात केली. तीन मिनिटेपर्यंत सतत कुत्र्याची मुले कार्यकर्त्याला बडवत होती. कोणीतरी गावातला माणूस आला व त्याने 'मारू नका. तुमच्यावर केस होईल' असे सांगितले. तेव्हा त्यांनी मारण्याचे थांबविले. 'मला मारून एक चूक केलीच आहे, निदान माझी वही व कागदपत्रे तरी परत करा' असे कार्यकर्त्याने सांगितल्यावर 'देत नाही, तुला काय करायचे ते कर' असे कुत्र्याच्या पोरांनी त्याला ऐकवले.

यशस्वी सत्याग्रही मजुरांबरोबर जुवाणीला परत येऊन तीनचार साक्षीदारांसह कार्यकर्त्याने तळोदा पोलिस स्टेशनवर फिर्याद नोंदवली. पोलिसांनी तक्रार घेतली व लगेच करडे येथे त्याच दिवशी रात्री चौकशीसाठी पोलीस गेले. दि. २३

माच ७२ ला सकाळी मारलेल्या जागेचा पंचनामा होऊन सर्व सव्वीस सत्याग्रहींचे साक्षी जबाब घेण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी काय केले हे अजून समजले नाही. आरोपी म्हणून खालील पाचजण तक्रारीत नोंदविले गेले आहेत–

(१) दल्या कुऱ्या (२) वेरांग कुऱ्या (३) फेरांग कुऱ्या (४) शायसिंग कुऱ्या (५) बच्चो कुऱ्या.

कार्यकर्त्यांची वही व महत्त्वाचे कागदपत्र पोलिसांनी जप्त केले आहेत.

–श्याम

## २ : मुक्काम कुरंगी : ता. शहादे

तारीख १९-२-७२. शनिवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास देवाजी विकला (मूळ जमीनमालक) ह्याने पोलीस संरक्षणासाठी रायखेड पोलीस चौकीत अर्ज दिला. हावलदारने अर्ज घेतला व तारीख २०–२–७२ रोजी शेतावर येण्याचे कबूल केले.

दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास श्री हारी हांजी (सावकार) ह्यांना भेटण्यास गेलो. ते घरी नव्हते. त्यांना आम्ही रविवारी सकाळी भेटावयास येत आहोत असा निरोप ठेवून आम्ही कुरंगीला गेलो. रात्री ९।। ते १० च्या सुमारास शिवाजी देवाजी, दशरथ खंत्या कुरंगी ऑफिसमध्ये आले. त्यांनी असे सांगितले, की श्री. हारी हांजी हा खळ्यात उभा राहून तुम्हास अत्यंत अभद्र शिव्या देत आहे व मारण्याची धमकी देत आहे. तरी तुम्ही चला. ह्या दोघांना आम्ही सकाळी येतोच असे सांगून, त्यांना धीर देऊन परत श्रीखेडला पाठविले.

सकाळी ९–९।। च्या सुमारास श्री. हारी हांजी (सावकार) यांच्या वाड्यावर गेलो. सोबत देवाजी विकला, इंद्रसिंग फूलसिंग, भाईदास वेलजी, श्री. शिवराम, दीनानाथ व वाहरू असे आम्ही ६–७ जण होतो. श्री हारी हांजी घरी नव्हते. इंद्रसिंग त्यांना बोलावून, आणण्यास गेला. श्री हारी हांजी आल्यावर, आपण जर तुमची तैय्यारी असेल तर बरोबर बसू व काही समझोता करता आल्यास विचार करू; दोघांचीही बाजू ऐकून घेऊ आणि काही मार्ग काढू; हे कबूल नसल्यास कायद्याने काय करता येईल ते आम्ही करू. असे कार्यकर्त्यांनी त्यांना सांगितले. तेव्हा दिवानजी हरी म्हणाला "ये क्या तमाशा चल रहा है, तुमको जो कानून से करना है कर लो." त्याच वेळी श्री. बाबूलाल हरी हा बाजूला बसला होता. त्याने "यांना चहा पिण्यास म्हणून वर घेऊन चला आणि चांगले पिटून काढू" असे म्हणून अत्यंत अभद्र शिव्या दिल्या. आम्ही तिथून निघालो व पोलीस चौकीत गेलो. पोलीस चौकीत असे कळाले, की हवलदार मुबारकपूरला गेला आहे व तो तुमच्याकडे येईल. आम्ही श्रीखेडला सध्याकाळपर्यंत वाट बघितली. त्यानंतर आम्ही रात्री कुरंगीला गेलो.

सकाळी ९–९।। ला श्रीखेडला गेलो व १२ वाजेपर्यंत पोलिसांची वाट पाहिली. अखेर शेतात दादरची कापणी सुरू केली. कापणी सुरू असताना पीक–संरक्षण–

समितीचा वॉचमन गन्या तिथे आला व म्हणाला पीक-संरक्षण-समितीचा पास दाखवा किंवा कापणे बंद करा. त्याच वेळी द्वारका फेरांगा वॉचमन हाही तिथं आला. आम्ही म्हटले माणूस खेतियाला पाठवितो; तो पैसे भरून पावती घेऊन येईल. तेव्हा गणा म्हणाला, मी तुमच्या माणसाबरोबर खेतियाला जातो. शिवाजी, रामदास व गणा खेतियाला निघाले व आम्हीही गावात येऊन थांबलो.

थोडचा वेळात, आणखी दोन वॉचमन व दुसरा एकजण असे तिघे शेताकडे जाताना दिसले. दुरून रामदास व शिवाजी हेही परतून शेतात जाताना दिसले. आम्हीही शेताकडे गेलो. शेतामध्ये पोचलो, तेव्हा तिघे वॉचमन बाबुलाल हरी, रामदास हरी आणि इतर दोघे तिथे होते. आम्ही असे विचारले, की पीक-संरक्षण-समितीचे कोणी अधिकारी येथे आहेत काय ? आम्ही पैसे भरतो. त्याची पावती द्या.' तेव्हा त्यांच्यापैकी एकाने सांगितले, की पाटीलला येऊ द्या. तो सांगेल तसेच करू.

थोडयाच वेळात दशरथ पाटील, सार्यसिंग, फफेन्या, सुपाल्डया, उत्तम, ठानसिंग व श्रीखंडचे व उखळशेमचे इतर असे साधारणतः ३०–३५ लोक तिथे आले. आल्याबरोबर त्यांनी आम्हास वेढले. काही जणांच्या हातात काठ्या होत्या. सायसिंगने "तुमरी ज्वणे बावने, कांची मा मार यू गाल देऊ, तुमरी मीन तेवी, तुम हुते मारी बायरे होते गाडीदेहू, काय जांणल्यू. मारी बायरी तेवी तेवा." ह्या प्रकारे अभद्र शिव्या दिल्या. दशरथ हरी हा म्हणाला 'तू खेतियाला चल. तिकडं न्याय करू.' आम्ही सांगितले, की आपण रायखेडला पोलीस चौकीत जाऊ. तिथं जो काय फैसला होईल, ते बघू.' यानंतर बाबूलाल पुढे सरसावला व दातओठ खाऊन, संतापून म्हणाला, 'खेतियाला पकडून घऊन चला, कसा येत नाही बघू.' तेव्हा दीनानाथने सांगितले, की 'मी महाराष्ट्रात आहे. आणि मी खेतियाला येणार नाही. रायखेडला चला.' तेव्हा दशरथ हरी 'तुला खेतियालाच यावे लागेल. तिथे तुझा काय कायदा आहे ते दाखव.' असे म्हणाला. 'मी आपल्या पायाने तिथे (खेतियाला म्हणजे मध्यप्रदेशात) येणार नाही. पाहिजे तर तुम्ही मला दोराने बांधा किंवा उचलून न्या' असे दीनानाथ म्हणाला. नंतर बाबूलाल म्हणाला, 'तुमरा जोबळा मा मार यू गाली देऊ तुमरी मीनते, तुमरी कानून बावान काची मा पारयू गाल देऊ, तुमरी मीन तेवा, केहनी आवतीली मारी बायरेहो दुर कोरीन बांधीन लिजाहु मारी बायरेहो, नीहो उखलिनं कि चालु मारी लाडीही.' ह्याप्रमाणे बराच वेळ बाबूलाल उत्तम व सार्यसिंग हे अभद्र शिव्या देऊन धमक्या देत होते. काठ्या उभारून मारण्याची धमकी देत होते.

अखेर बराच वेळ वाद झाल्यावर बाबूलालने कमरेभवती हात घालून दीनानाथला उचलला व २०–२५ पावले घेऊन गेला. त्या नंतर वॉचमन गना व द्वारका ह्यांनी त्याचे दोन्ही हात पकडून त्याला खेचत खेतियाकडे नेले. जात असताना वाटेत बाबूलाल, ठानसिंग, सार्यसिंग, उत्तम हे शिव्या देत व धमक्या देत चालले होते....

—दीनानाथ

विजय वैद्य



# ‘बंडखोरांची’ लोकशाही समाजवादी आघाडी

निवडणुकीत नामोहरम झालेले, विस्कळीत झालेले विरोधी पक्ष विधानसभेचे अधिवेशन सुरू होताच सत्तारूढ कॉंग्रेसपक्षाविरोधी सर्व शक्ती एकत्र आणता येतात का या कार्याला लागले. अजून तरी सर्वच्या सर्व विरोधी पक्षांची एकच आघाडी बनू शकली नाही आणि विविध तत्त्वप्रणाली असलेले हे सारे पक्ष एकत्र येतील अशी शक्यताही वाटत नाही. काही विशेष मुद्द्यावरच तात्कालिकपणे हे सारे पक्ष कदाचित एकत्र येऊ शकतील.

कॉंग्रेसच्या घवघवीत यशाला मोठे खिडार जर कोणी पाडले असेल तर ते कॉंग्रेसमधील बंडखोरांनीच. या बंडखोरांचा गट विधानसभेत सर्वांत मोठा आहे. म्हणूनच बंडखोरांचा सारा गट आपल्याकडे खेचता आला तर फार मोठे घबाड हाती येईल अशा विचाराने शे. का. पक्ष व इतरांनी समझोत्याचे प्रयत्न केले, पण त्याला यश आले नाही. यामुळे अधिकृत विरोधी पक्ष म्हणून कोणालाच मान्यता मिळू शकलेली नाही.


आता हा गट (सध्या यात १८ आमदार आहेत. पण विदर्भाकडील व इतर काही आमदार यात सामील होण्याची शक्यता बोलली जाते. म्हणजे त्यांचे बळ २२ पर्यंत जाण्याची शक्यता आहे.) ‘लोकशाही समाजवादी आघाडी’ या नावाने विधानसभेत काम करणार आहे.

या गटाचे नेते म्हणून श्री. ए. टी. पाटील यांची, तर उपनेते आणि प्रतोद म्हणून अनुक्रमे. श्री. केशवराव शिंदे-पाटील व श्री. बार्शीकर यांची निवड झाली आहे. श्री. शंकरराव कोल्हे – शिर्डी कोपरगाव, श्री. सदाशिवराव मंडलीक – कागल–कोल्हापूर अशी बरीच प्रमुख मंडळी या गटात आहेत.

तिकिटे नाकारण्यात आली म्हणून बंडखोरी करण्यात आली हे सर्वांच्याच बाबतीत खरं नाही.

पृष्ठ ६२ वर

# परकीय भांडवल आणि भारताचा औद्योगिक विकास



## कुमुद पोरे

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये स्वकीय सरकारने देशातील आर्थिक विकासास चालना देणे आणि जनतेचे राहणीमान उंचावणे ही उद्दिष्टे घोषित केली आणि १९५१ सालापासून आंशिक नियोजनाचा अवलंब केला. आर्थिक विकासामध्ये औद्योगिक विकासाचे स्थान फार महत्त्वाचे आहे. औद्योगिक विकास झपाट्याने होण्यासाठी भांडवली वस्तूंचे उत्पादन वाढविणे व प्रगत औद्योगिक उत्पादन तंत्र स्वीकारणे आवश्यक मानले गेले. आपल्या देशातील साधन सामग्रीचा सारासार विचार करून आपल्या अर्थव्यवस्थेस पेलेल आणि नैसर्गिक संपत्ती व मनुष्यबळ यांचा सर्वोत्तम उपयोग करून घेता येईल ह्या दृष्टीने कोणते तंत्र व उद्योगधंदे योग्य आहेत याचा विचार औद्योगीकरणाचे धोरण आखताना झाला नाही. अनेक वर्षे परकीय साम्राज्यशाहीच्या आधाराने वाढलेल्या आपल्या भांडवलदार वर्गाची स्वयंप्रेरणेने स्वकष्टाधिष्ठित उद्योगधंद्याची रचना करण्याची तयारी नव्हती. कष्ट मर्यादित ठेवून थोडक्या अवधीत भरमसाठ नफा मिळविण्याच्या उद्दिष्टाने परकीय भांडवल आणि तंत्र-यंत्रणा उधार उसनवारीने घेण्यास हा वर्ग प्रवृत्त झाला. भारताचा औद्योगिक विकास घडवून पुढारलेल्या जगाबरोबर झटपट स्थान मिळविण्याकरता अशा धोरणाची गरज आहे असे फसवे समर्थन करून सरकारने ह्या स्वार्थी प्रवृत्तीला प्रोत्साहन दिले. वस्तुतः देशातील भांडवली वस्तूंची निर्मिती

पाकिस्तानशी नुकत्याच झालेल्या संघर्षाच्या वेळी कोणत्याही स्वरूपाच्या परकीय मदतीवर अवलंबून राहिल्याने निर्माण होणाऱ्या आर्थिक व राजकीय संकटाची जाणीव आपणास विशेष प्रकर्षाने झालेली आहे. ह्या संदर्भात, परकीय भांडवलाशी संगनमत करून आतापर्यंत करण्यात आलेल्या औद्योगीकरणाचे स्वरूप समजावून घेतल्यास भारतीय अर्थव्यवस्था आज इतकी अपंग का झालेली आहे हे लक्षात येण्यास मदत होईल.

पुण्यातील शंकर ब्रह्मे समाजविज्ञान ग्रंथालयाच्या-वतीने या विषयाची सांगोपांग चर्चा करण्याकरता एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. ह्या चर्चासत्रात सादर केलेल्या निबंधावर आधारित प्रस्तुत लेख तयार करण्यात आलेला आहे.

वाढविण्यासाठी चालू उपभोगामध्ये काटकसर करणे जरुरीचे होते आणि त्यासाठी मोठी झीज सोसणे अपरिहार्य होते. ते करण्याची आपली तयारी नव्हती. परिणामी गली वीस वर्षे आपण परकीय भांडवल, तंत्रविद्या व आर्थिक मदत यांची सामाजिक हिताचा विचार न करता याचना करीत राहिलो. ह्या परकीय भांडवलाने आणि त्याबरोबर स्वीकारल्या गेलेल्या आधुनिक भांडवलप्रधान उत्पादनतंत्राच्या वापरामुळे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला कसे विकृत वळण लागलेले आहे आणि आंतरराष्ट्रीय भांडवलदारांनी भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये स्वतःकरता कसे कायमचे घर करून ठेवलेले आहे ह्यासंबंधी अधिक डोळसपणे विचार करण्याची आज वेळ आलेली आहे.

भारतीय सरकारने गेल्या वीस वर्षांच्या काळात परकीय सहकार्याने चाललेल्या सुमारे साडेआठशे कंपन्यांच्या वतीने एकूण तीन हजारचे वर (३,१९३) करारनाम्यांना मंजुरी दिलेली आहे. त्यांपैकी ८३४ करारनामे इंग्लंडमधील भांडवलदारांबरोबर, ५६५ करारनामे अमेरिकेतील भांडवलदारांबरोबर आणि ४९६ करारनामे पश्चिम जर्मनीतील भांडवलदारांबरोबर करण्यात आले. ह्या करारनाम्याच्या आधारे परकीय भांडवलाचा वाढता ओघ भारतामध्ये वाहू लागलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारतात साधारण २२६ कोटी रुपयांचे परकीय भांडवल

तक्ता क्र. १ : परकीय सहकार्याने चाललेल्या भारतीय कंपन्यांमधील भांडवल

| उद्योग | पब्लिक लिमिटेड कंपनीज भांडवल* (लाख रु.) | परकीय कंपन्यांच्या उपकंपन्या भांडवल (लाख रु.) | परकीय भांडवली सहकार्याने चाललेल्या कंपन्यांचे भांडवल (लाख रु.) | परकीय सहकार्याने चाललेल्या कंपन्यांचा पब्लिक लिमिटेड कंपन्यांच्या भांडवलातील वाटा (प्रतिशत) |
|---|---|---|---|---|
| मळे, खाणी | १३,९८३ | ४२ | ३,९४५ | २८·५ |
| पेट्रोलियम | १७,८९९ | ८,६०४ | ९,१८५ | ९९·३ |
| खाद्यपदार्थ, पेये व तंबाखू | २२,०४६ | ४,३३५ | २,२१२ | २९·० |
| कापड | ८३,४४२ | — | ५,८९७ | ७·१ |
| वाहतुकीची साधन सामग्री | २१,०५२ | ३,०५७ | ११,८०७ | ७०·६ |
| यंत्रसामग्री आणि यंत्र उपकरणे | १४,२७६ | १,१५९ | ४,७१४ | ४१·१ |
| धातू व धातू-उत्पादने | ४७,७९१ | ६,३३७ | ६,६६५ | २७·२ |
| विजेची उपकरणे, आणि यंत्रसामग्री | ११,९५९ | ३,३३८ | ६,३३० | ८०·८ |
| रासायनिक व अनुषंगिक उत्पादने | २२,९७७ | ११,३३८ | १०,७३५ | ९६·० |
| रबरी उत्पादने | ४,३२१ | ३,५६६ | — | ८२·५ |
| इतर वस्तू | ४८,७५२ | १,६३६ | १२,४९९ | २७·० |
| सेवा | ४०,५५७ | २,३०० | १०,२७९ | ३१·० |
| एकूण | ३,४९,०५५ | ४५,७१२ | ८४,२६८ | ३७·२ |

* यामध्ये १९६३–६४ साली रिझर्व बँकेने अभ्यासलेल्या एकूण १३३३ मोठ्या पब्लिक लिमिटेड कंपन्यांचा समावेश होतो. एकूण पब्लिक लिमिटेड कंपन्यांतील सुमारे दोन तृतीयांश भांडवल ह्या कंपन्यांमध्ये केंद्रित झाले होते.

होते ते आज जवळ जवळ १६०० कोटी रुपयांपर्यंत वाढलेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात परकीय भांडवल हे मुख्यत्वे मळे, खाणी इत्यादी क्षेत्रांमध्ये पेरले गेले होते. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये परकीय भांडवलाचा फार मोठा हिस्सा हा औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्रात गुंतविला गेला असून त्यातही वाहतुकीची साधने, यंत्रसामग्री आणि यांत्रिक अवजारे, पेट्रोलियम, औद्योगिक आणि औषधी रसायने, विजेची यंत्रे ह्यासारख्या औद्योगिक विकासासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या औद्योगिक उत्पादनक्षेत्रामध्ये परकीय भांडवल मोठ्या प्रमाणात गुंतविले गेले आहे. एवढेच नव्हे तर ह्या क्षेत्रांमधून परकीय सहकार्याने चाललेल्या कंपन्यांचे फार मोठे वर्चस्व आहे. (तक्ता क्रमांक १ पहा.)

## परकीय भांडवलदारांचे नंदनवन

भांडवलशाही देशांमध्ये खाजगी नफा हा भांडवलगुंतवणुकीचा प्रेरक हेतू असल्यामुळे भांडवल हे स्वदेशात अगर परदेशात, जेथे अधिक नफा मिळेल तेथे जाणार हे उघड आहे. अमेरिकन सरकारच्या व्यापारविभागाने प्रसिद्ध केलेल्या एका अभ्यासानुसार औद्योगिक क्षेत्रात गुंतविलेल्या अमेरिकन भांडवलास सर्वसाधारणपणे १०·८ टक्के नफा मिळतो तर भारतामधील औद्योगिक भांडवलगुंतवणुकीवर अमेरिकन भांडवलदाराला १४·७ टक्के नफा मिळतो. जपानमधील मित्सुबिशी मिशनच्या अहवालातही जपानी भांडवलदाराला भारतामध्ये भांडवल गुंतविणे कसे फायद्याचे आहे हे दाखवून दिलेले आहे. ह्या अहवालानुसार भारतातील तांत्रिक कामगारांची उत्पादनक्षमता जपानी कामगाराच्या तुलनेने २० टक्क्यांनी कमी आहे. परंतु भारतीय कामगाराचे वेतन जपानी कामगाराच्या वेतनाच्या केवळ एक पंचमांश आहे. म्हणजेच, एका जपानी कुशल कामगाराच्या वेतनाच्या मोबदल्यात त्यांच्या चौपट उत्पादनक्षमता जपानी भांडवलदाराला भारतामध्ये मिळू शकते. दक्षिण कोरिया, फोर्मोसा, पाकिस्तान आणि इतर आशियाई अविकसित राष्ट्रांच्या मानाने भारतामध्ये कुशल कामगार आणि तंत्रज्ञही मुबलक प्रमाणावर उपलब्ध आहेत. तसेच भारतातील राजकीय वातावरणही भांडवलशाहीस पोषक असेच आहे. त्यामुळे परकीय भांडवलदारांना भारतीय अर्थव्यवस्था म्हणजे भांडवलगुंतवणुकीकरता नंदनवन वाटावी ह्यात नवल नाही. परंतु योजनाकारांनी कोणत्या अपेक्षेने परकीय भांडवलाची आणि उत्पादनतंत्राची आयात करण्याची मुभा भारतीय खाजगी उद्योगांना दिली आणि त्या अपेक्षा किती प्रमाणात फलद्रूप झाल्या हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे.

पहिला अपेक्षित फायदा म्हणजे आपल्या देशात तयार न होणाऱ्या वस्तू नव्याने बनविण्यासाठी आधुनिक परकीय तंत्राचा वापर केल्यास आयातीत बचत होऊ शकेल असा होता. परंतु अनेक वस्तूंच्या बाबतीत भारतीय कंपन्या ह्या परकीय सहकार्याने चाललेल्या कंपन्यांच्या क्षेत्रामध्ये उत्पादन करीत आहेत असे आढळते. अशा वस्तूंची एक मोठी यादी भारत सरकारच्या औद्योगिक परवाना चौकशी

पृष्ठ ४७ वर

सौ. तारा पंडित

# हे कलकत्ता

## आता शेख महंमदी स्वप्ने पुरेत

गाढ निद्रिस्त शेख महंमद स्वप्ने रंगवीत होता—'...मग मी राजा होईन... लग्न करीन...अशी लाथ मारीन..." त्याने खरोखरच लाथ मारली. कुंभाराच्या मडक्यांचा नि महंमदाच्या स्वप्नांचा एकदमच चुरा चुरा झाला.

आज अगदी हीच पाळी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षावर आली आहे. हिरीरीने त्यांनी निवडणुका लढवल्या. हातात सत्ता आली, की 'हे करू नि ते करू' अशी स्वप्नं रंगवली आणि अरेरे! मतपेटीने त्यांची सारी शेख महंमदी स्वप्ने जमीनदोस्त करून टाकली!

श्री. ज्योती बसूंचा ३९ हजार मतांनी पराभव झाला. अपेक्षेबाहेर जोरदार अपयश! सतत सव्वीस वर्षं ताठ ठेवलेली मान आज खाली झुकली आणि The ballot is stronger than the bullet हे पुन्हा एकदा सिद्ध झालं.

एके काळी ज्योती बसूंचा सहकारी म्हणविणाऱ्या उमेदवारानेच ३८,९८७ मतांनी विजयी होऊन बसूंना निवडणुकीच्या युद्धभूमीवर सपशेल लोळवलं हे विशेष आश्चर्य!

श्री. ज्योती बसूंनी राजकारणात सर्वप्रथम पदार्पण केलं ते १९४६ मध्ये CPI चे उमेदवार म्हणून. त्यावेळी त्यांनी हुमायून कबीर यांच्यावर मात केली होती आणि मग स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तर प्रत्येक वेळी—अगदी १९७१ पर्यंत—ते सतत विजयी होत गेले. वास्तविक बारानगर म्हणजे श्री. बसूंचा बालेकिल्ला. पण तिथेसुद्धा ह्यावेळी अपयशच पदरी पडावं हा केवढा दैवदुर्विलास!

ह्या अपयशाचा परिणाम काय झाला असेल म्हणता? दुसरा काय होणार? पक्षाचा प्रत्येक घटक क्रोध आणि दुःख ह्यामुळे बेचैन झाला आहे. आता ह्या लोकांना देवबिव पटत नाही म्हणून; नाहीतर भगवान् श्रीकृष्णाने गीतेत सांगितलेले क्रोधाचे दुष्परिणाम यांना ऐकवले असते.

> क्रोधात् भवति संमोहः संमोहात् स्मृतिविभ्रमः ।
> स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशो, बुद्धिनाशात् प्रणष्यति ॥

हे ऐकून मनात ठसवलं तर अर्जुनासारखा तेही विचार करू शकतात; स्वतःचं हित कशात आहे याचा शोध घेऊ शकतात. पण...

सध्यातरी पश्चात्तापाचं करुण संगीतच त्यांच्या ओठांवर रुळत आहे. शिवाय '' हे इलेक्शनच फसवे आहे ' इत्यादी कागाळयाही सुरू आहेत. अहो, भावनाविवश होऊन उच्चारलेले शब्द फार काळ टिकत नसतात आणि हिंसात्मक राजकारण जनतेला कधीच पसंत पडत नसतं. लोकहितासकट सर्व काही पणाला लावून फक्त आपल्या पक्षाचं महत्त्व वाढवणं म्हणजे स्वत:च्या हाताने स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेणं आहे हे यांना का कळू नये ? अरेरावी करण्यात सर्व वेळेचा अपव्यय करण्याऐवजी लोकमत आपल्या बाजूने वळवणं हे अधिक महत्त्वाचं आहे. कारण शेवटी ह्या लोकमताच्या पायावरच कोणताही पक्ष उभा असतो हे विसरून चालेल का कधी ?

आता मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने अपयशाच्या धक्क्याचा भर ओसरताच आत्मसंशोधनाला सुरुवात करावी. आपला पराजय का झाला याची कारणे त्यांना सहज उलगडतील. सर्व प्रश्न सुलभ रीतीने सुटावेत यासाठी मध्यवर्ती सरकार व राज्य सरकार यांच्यात तडजोड असणं किती आवश्यक आहे, तेही कळेल. ' बोले तैसा चाले ' ह्या उक्तीनुसार इंदिराजींनी आपले नेतृत्व शक्तिशाली बनवून दाखवले. परंतु दोन वेळा संधी मिळूनही मार्क्सवाद्यांना हे जमलेच नाही. याचे कारण जनतेची सेवा करायची सोडून उलट दहशतवादाचा अवलंब करून स्वत:च्या पक्षाची सत्ता वाढवायची हे चुकीचे ध्येय त्यांनी समोर ठेवले होते.

आता तरी त्यांनी डोळे उघडे ठेवावेत. अपयशामुळे निर्माण झालेले क्रोध आणि दु:ख हे विकार बाजूला सारावेत. आता पाच वर्षांची दीर्घ मुदत हाताशी आहे- स्वार्थ वाढवण्याऐवजी काही सत्कर्माचाही विचार करावा नि पुढच्या निवडणुकांमध्ये मिळणाऱ्या संधीची वाट बघावी. नुसती शेख महंमदी स्वप्ने रंगवण्यात काय अर्थ आहे ?

## भिंतींचा हा मेकप

आता निवडणुका संपल्या आहेत. पण शहरात ठिकठिकाणी भिंतीवर लिहिलेली जाहिरातींची अक्षरं मात्र तशीच राहणार. जोवर ती मुद्दाम पुसण्यात येत नाहीत किंवा दुसरी एखादी निवडणूक उभी राहात नाही तोवर. त्या भिंती अशाच रंगीबेरंगी व कलात्मक पद्धतीने, नागमोडी वळणाने लिहिलेल्या जाहिरातींच्या अक्षरांनी सुशोभित राहणार आहेत. सुशोभित म्हणायचं यासाठी, की आजवर झालेल्या सर्व निवडणुकांचे वेळी जाहिराती फक्त काळ्या व साधे वळण असलेल्या अक्षरांनीच लिहिल्या गेल्या होत्या. परंतु यावेळचे दृश्य अगदी वेगळे आहे. भिंतींना चुन्याने सारवून त्यावर सुंदर रंगीत अक्षरांनी विशिष्ट वळणांनी जाहिरातींचे फलक लिहिलेले

आढळतात. असं म्हणतात, की ह्या कामी अनेक कलाकारांची खास नेमणूक करण्यात आली होती. त्यांनीही अगदी उदारहस्ते रंगाचा वापर केला. नजर खेचून घेणाऱ्या जाहिराती ठिकठिकाणी झळकू लागल्या.

जाहिराती लिहिण्यापूर्वी ज्यांच्या मालकीच्या इमारती असतील त्यांची परवानगी घेण्यात यावी. एरवी जाहिराती लिहून भिंती खराब करू नयेत असा नियम जाहीर झाला होता. पण हा नियम प्रसृत होण्यापूर्वीच कित्येक ठिकाणी जाहिराती लिहून तयारही होत्या. मग तर नियमाकडे सर्वांनीच दुर्लक्ष केलं आणि जागा सापडेल तिथे जाहिरातीची अक्षरे विराजमान झाली. शहरातील लोकांच्या प्रवृत्ती उल्हसित करण्याचं काम अजाणता ह्या रंगीत अक्षरांनी केलं आहे, एवढं खरं! आता येणारा पावसाळा काही जास्त दूर नाही. पावसाच्या पाण्याने भिंतीचा सारा मेकप धुवून निघेल. तेव्हा त्या किती घाणेरड्या दिसतील ह्या कल्पनेनेही मनात एक प्रकारची अस्वस्थता निर्माण होते. अर्थात असा विचार करण्याऐवजी ह्या रोगग्रस्त शहराच्या जीवनाला मेहनत घेऊन तयार केलेल्या रंगीबेरंगी जाहिरातींच्या सुंदर अक्षरांनी काही काळ टवटवीच आणली होती असंच आपण का म्हणू नये ?

## आमचे शेजारी-भिकारी

जगातील इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा भारतात सर्वांत अधिक भिकारी आहेत. भिकाऱ्यांकडून कोणी कसलीही अपेक्षा करीत नाही. भिकाऱ्याचा धर्म किंवा राजकीय मत जाणून घेण्याच्या भानगडीतही कोणी पडत नाही. अर्थात भिकाऱ्यांचा मुक्त संचार हीदेखील जरा जुनीच गोष्ट झाली. कारण दीडदोन वर्षांपूर्वीच


# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

मूल्य : रुपये अठरा

राजहंस प्रकाशन, पुणे

कलकत्ता पोलीसच्या स्पेशल शाखेने १६,१२४ भिकाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या होत्या. सरकारी अंदाजानुसार खुद्द कलकत्त्यातच ३६ हजार भिकारी असावेत. त्याच्यापैकी पुष्कळसे अपंग मुलांना जवळ बाळगून रोज भीक मागण्याचा धंदा अगदी पद्धतशीरपणे करतात. अलीकडे मात्र रस्त्यावर उभे राहून वाहनातील लोकांना भीक मागणं आणि त्यायोगे मार्गात अडथळे निर्माण करणं हा कायद्यानेच गुन्हा ठरविला आहे. अर्थात पोलीस कमिशनरची अगोदर तशी परवानगी घेतली तर मात्र गुन्हा माफ! पण अशा तऱ्हेची परवानगी कोणी कधी काढली असल्याचं ऐकिवात नाही. तरीदेखील ठिकठिकाणच्या ट्राफिक लाईट्स्‌जवळ हटकून भिकारी हे आढळणारच.

याबाबतीत इतर राज्यांनी बरंच काही केलं आहे. विशेषत: तामिळनाडू हे उल्लेखनीय आहे. भिकाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी श्री. करुणानिधींनी दोन लाखावर फंड जमविल्याचे ऐकिवात आहे. याउपरही प्रश्न सुटला नसेल तर ज्यांची शरीरे धडधाकट आहेत अशांना काम करायला लावून स्वत:चे अन्न स्वत: कमविण्यास त्यांना शिकविता येईल. तेथील एकूण ६० हजार भिकाऱ्यांपैकी ६० टक्के भिकारी सहज काम करू शकतात. एकंदरीत भिकाऱ्यांना जीवन जगण्याच्या सोयी उपलब्ध करून देणं हे निराळं आणि भीक मागण्याच्या धंद्यावर केवळ बहिष्कार टाकणं निराळं. सरकारने वर नुसताच कायदा बनवून भीक मागण्याचा धंदा दोषी ठरविला आहे. परंतु भिकाऱ्यांसाठी दुसऱ्या कोणत्याही उपाययोजना अस्तित्वात नाहीत. पंजाबमध्ये १२ हजार भिकारी आहेत. त्याच्यासाठी 'भीक मागितल्यास शिक्षा होईल' असा कायदा फक्त करण्यात आला आहे. परंतु त्याऐवजी त्यांनी काय करावे हे मात्र कोणीच सांगत नाहीत. हरियाना मध्येही अशाच तऱ्हेचा कायदा करण्यात आला असून त्यात भिकाऱ्यांसमवेत रस्त्याच्या कडेला बसून भविष्य सांगणारांचाही समावेश आहे. या उलट राजस्थानमध्ये भिकाऱ्यांना स्वत:चा धंदा काढण्यासाठी राष्ट्रीय बँकेकडून कर्ज मिळण्याची व्यवस्था केलेली आहे. हातमाग, सुतारकाम आणि चहाची दुकाने इ. धंदे भिकाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी प्लॅनिंग कमिशनकडून प्रोत्साहन देण्यालायक ठरू शकतील. ऑस्कर वाईल्ड यांनी एके ठिकाणी म्हटले आहे– 'नुसते घेण्यापेक्षा भीक मागून घेतलेलं बरं; परंतु भीक मागण्यापेक्षा न मागता मिळालेलं अधिक बरं!' जर भारतातील सर्व भिकाऱ्यांनी म्हणजे १९६१ च्या शिरगणतीनुसार दहालाख आणि आतापर्यंत कदाचित दुप्पट झालेल्या ह्या सर्वांनी वरील हितोपदेश एकजुटीने मान्य केला तर बँकेची जी काय फंडाची रक्कम असेल तिचे सुंदर लोणचे बनू शकेल!

◻ ◻ ◻

# नेमेचि येतो मग पावसाळा !

चंद्रमौळी जुनं घर असावं. नेमेचि येणाऱ्या पावसाळयात ते नेमेचि ठराविक ठिकाणी गळते. ग्रीष्म संपला – वसंत आला – तो श्रावण – ती कोकिळा – पहिला पाऊस – मातीचा सुवास – ते सारं ठेवा तुमच्याजवळच ! ह्या घरवाल्यां-समोर चिंता निराळीच. गेल्या पावसाळाच्या खुणांखाली पातेली ठेवायचीच असतात, पण नव्या कोणत्या ठिकाणी गळणार हीच उत्सुकता. सारीच कौले कशी बदलता येणार ? तेव्हा गप्प बसण्याशिवाय काय करणार ? आज तुम्ही आम्ही सारेजण जणू अशाच चंद्रमौळी घरात राहातो आहोत. दरवर्षी ह्याच एप्रिल महिन्यात बजेटाचा पावसाळा नेमेचि मग झोडपून काढतो. मागचे कर काय रद्द होणार ? विचार करणे एकच – तो म्हणजे नवा कर कुठे बसणार अन् किती ? आणि मग सरकारचे बजेट, तुमच्या स्वतःच्या मासिक बजेटाला सतरा ठिकाणी नव्याने गळती लावते. ' टप् टप् टप् सगळीकडे धारा !' कुठवर पुरे पडणार ?

मन रमविण्यास तुमच्याकडे तिकडे निवडणुका तरी होत्या ! पण इकडे ? आधी पहिला पाऊस पडला कार्पोरेशनच्या बजेटाचा. पावणेतीन कोटींचा (फक्त !) घाटा. साडेचौदा कोटींची जमा – तेवढाच सारा खर्च. मागील कर्जाचा डोंगर तसाच पुढील वर्षासाठी. आनंदाची गोष्ट म्हणजे नवे कर आजच्या घडीला तरी बसलेले नाहीत. अशी हातातोंडाची गाठ जेमतेम असल्यावर कसली नवीन कामे अन् कसले काय ? आयुर्विमा कार्पोरेशनच्या पाच लाखांच्या कर्जातून एक अनेक मजली इमारत, मेयरसाठी बंगला दोन लाखांचा आणि सव्वा दोन लाखांचे नवे सर्कल ऑफीस हीच तीन कामे अपेक्षित. त्यालाही विरोध झालाच. कार्पोरेटर एस. जी. विनायगामूर्ती (कॉ–ओ) यांनी सभागृहातच यापूर्वीच्या बांधलेल्या इमारतींची रडगाथा सांगितली. सैदापेठेत दोन लाखांचा धोबीघाट पाच वर्षांपासून बांधून तसाच पडलाय, कोसापेठेतील एक लाखाची इमारत बांधून फक्त ३ वर्षेच झालीत म्हणे. कोरक्कूपेठेतील ४० हजारांचे 'मच्छिमार्केट' गेली पाच वर्षे कुलूप लावून पडलेय. दूर कशाला, खुद्द कार्पोरेशनच्या पाठीमागे बांधलेल्या ५० हजारांच्या प्रयोगशाळेला बांधून तीन वर्षे झालीत ! ह्यांच्या उद्घाटनांला काय मुहूर्त सापडत नाही की फीत कापायला लायक मंत्री मिळत नाही ? मूर्तीमहाशयांना कदाचित ठाऊक असावं, की मेयरांच्या बंगल्यास आत्ता दोन लाख, पण पुढे दरवर्षी तितकेच रुपये बागबगीचा – रंगसफेदी – फर्निचर – वीजफोनची बिले यांसाठी नियमितपणे

लागणार आहेत. तेव्हा अशी भाकड म्हैस हवीच कशाला? मद्रास ह्या ए-ग्रेड शहरास बांधलेली भाजी मंडईच नाही, ना सिटीबसेसचा स्टॅन्ड नाही. ना गावात बस-स्टॉप हे सांगून कुणाला खरं वाटणार नाही. पुस्तकांकरिता अप्पा बळवंत चौकाप्रमाणे मद्रासला ठिकाणच नाही. अशा इमारतीत चार पैसे गुंतविले तर गाळ्यांच्या भाड्यांमधून दुप्पट मुद्दल वसूल होईल. पण हे सांगावं कुणी अन् सांगितलं समजा कुण्या 'माणसानं' तर ऐकावं कुणी!

शेवटी वैतागून कार्पोरेटर्स, अर्थात द्रमुकवाले सोडून बाकीचे, म्हणू लागलेत, की पांडेचेरी, दिल्लीप्रमाणे मद्रास शहर केंद्रशासित ठेवा. कारण आज जरी करवाढ नसली, तरी पावणेतीन कोटींच्या तुटीची काय वाट? तशी वाट तयार आहेच म्हणा, सिग्नलचीच तेवढी खोटी आहे. सध्याचा ५% शिक्षण कर दुप्पट करावा, कार्पोरेशनच्या मोटारींचा कर माफ करून घेणे व प्रॉपर्टीचे नव्याने वर्गीकरणास मान्यता मिळवावी असा कार्पोरेशनचा विचार आहे म्हणे. ह्यातले शेवटचे 'नव्याने वर्गीकरण' हे गोड नावच भयंकर ठरेल. गेल्या आक्टोबरात मद्रास शहरातील काही बस-मार्गांचे असेच 'री-ऑर्गनायझेशन' झाले. ६१ क्रमांकाच्या बसने पूर्वी आवडी-ब्रॉडवे अंतरास ६५ पैसे पडत, ते ११० झाले. पूर्वी मिनिमम स्टेज १० पैसे होते, ते ३० पैसे झाले. दरवाढ नाही – फक्त री-ऑर्गनायझेशन!

एक मार्चला डॉ. करुणानिधींनी राज्याच्या बजेटाचे वेळी साऱ्यांना चकितच केले. अडीच कोटींची शिल्लक – हे काय भलतेच? अहो, ही सारी बाटलीबाईची कृपा! गेल्या एक सप्टेंबरला दारू खुली झाली, तेव्हा सात महिन्यांचे उत्पन्न अपेक्षित होते, बारा कोटी – तर प्रत्यक्षात मिळाले २४ कोटी. नव्या बजेटात तर अबकारी कर लीटरला २५ वरून १४ रु. केलाय. त्या अंदाजाने तामीळनाडू सरकारने ३५ कोटी जमेच्या बाजूला लिहिलेत. पण अडीच कोटी शिलकीचा आकडा फसवा आहे बरं. चालू वर्षाकरिता केंद्राकडून अपेक्षित मदत आहे ४५ कोटी ८० लाखांची तर त्याच वेळी, मागील कर्जफेडीचा तमीळनाडूचा चालू हप्ता होतोय ५३ कोटी ३८ लाखांचा. आता आली का पंचाइत? त्यावर मार्ग एकच – मुदत मागून घेणे!

नव्या बजेटाने तमीळनाडूतील विक्रीकर आणखीन थोडासा वाढला. गंमत पहा कशी आहे? तेवीस वर्षांपूर्वी दारुबंदीमुळे बुडणाऱ्या उत्पन्नाकरिता म्हणून विक्री-कर बसला. तेवीस वर्षांत त्याने चांगले हातपाय पसरले. आज दारुबंदी रद्द करून सरकार ३५ कोटी खिशात घालीत आहे. विक्रीकर उठणार असे चार पायांच्या गाढवालादेखील पटले नसते. अपेक्षा होती, तो थोडासा कमी व्हावा. निदान किमान आहे तोच कायम रहावा. पण रामा शिवा गोविंदा! उद्धवा, अजब तुझे सरकार! नव्या बजेटाने स्कूटर-मोटारींच्या करामध्ये १०% वाढ झाली. ह्याचा खरा फटका बसणार आहे लॉरीवाल्यांना. प्रवासी वाहतुक सरकारचीच आहे. एका हुकमासरशी ट्रान्स्पोर्ट खाते तिकडे २०% वाढ करून, दहा टक्केचा 'काळा बाजार' उजळ

माध्याने करू शकते. साऊथ इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स म्हणते, 'आज देशातील सर्व करांचा राजा म्हणजे RTO कर. इतका जबरदस्त कर जगातील कोणत्याही मागासलेल्या देशात नसेल. शिवाय टायर्सटच्यूब्जचा काळाबाजार, सुटया भागांवर २० % पर्यंत विक्रीकर. त्यात ही भर! कशी प्रगती व्हावी उद्योगांची?'

बजेटात 'मते मिळवण्याचे' राजकारण कसे शिरते पहा. कमाल जमीन धारणा आत्तापर्यंत ६० एकर होती, ती आता ४० झाली. शैक्षणिक ट्रस्ट, देवस्थानांच्या जमिनींनाही ही मर्यादा लागू होणार. खंडकऱ्यांनी जमीनधारकांना द्यावयाच्या मागील बाक्यांना सरकारने कायदा करून आजपर्यंत हप्ते बांधून दिले. नव्या बजेटाचे वेळी सरकारने जाहीर केले, की आता लौकरच मागील बाक्या रद्दच करून टाकू कायद्याने. सभागृहातच श्री. जी. स्वामीनाथन् (MLC) म्हणाले, 'बघा, ज्यांनी पोटाला चिमटा घेऊन वेळेवर पैसे भरले ते गाढव ठरले. अन् ज्या सधन पण गुंड खंडकऱ्यांनी आत्तापर्यंत पैसे चुकवले ते शहाणे ठरले. सरकारला मते हवीत ना? मग परस्परम् समर्पयामि!'

नव्या बजेटात सरकारी कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्ता वाढला. दुसऱ्या पे कमिशनमुळे २३ कोटींचा बोजा सरकारवर आहेच. आनंदाची (?) सुधारणा (अर्थात नालायक कर्मचाऱ्यांसाठीच) म्हणजे एक एप्रिलपासून ACR पद्धत बंद होणार आहे. कुणी लाचलुचपत, गैरशिस्त, उशीरा येणे वा काहीही केले तरी त्याची नोंद करण्यास आता 'ॲन्यूअल कॉन्फिडेन्शियल रिपोर्ट' फाईल असेल तर ना! तरीसुद्धा ५ दिवसांचा आठवडा करा व ओव्हरटाईम हवा ह्या त्यांच्या युनियनच्या मागण्या आहेतच शिल्लक!

शोचनीय स्थिती आहे केरळाची. साडेपाच कोटींची करवाढ करूनही, साडे-अकरा कोटींची तूट शिल्लकच! विक्रीकर वाढला, इरिगेशन खात्याने पाणीपट्टी २५ % नी वाढविली – त्यामुळे एक कोटी मिळतील. विजेच्या दरात वाढ होईल. शेतसारा वाढेल, शेतीवर प्राप्तीकर बसणार व कमाल स्थावर मिळकतीवर अधिक बंधने येणार. त्रावणकोर, कोचीन मलबार राजांचे तनख्यांचे २२ लाख वर्षीला वाचलेच आहेत! योजनेचा आराखडा ६४ कोटींचा, कमी करून ५८ पर्यंत आणला. तरीही केंद्राचा ओव्हरड्राफ्ट साडेअकरा कोटींचा शिल्लकच. सारी भिस्त मग केंद्रावरती. नाहीतरी १९६४ नंतर प्रथमच कॉंग्रेस मंत्रिमंडळ नांदतेय तेथे!

राज्यांना केंद्राकड बघता येते, केंद्र परदेशाकडे बघते, पण चंद्रमौळी घरातल्यांनी कुणाकडे बघायचे. नेमेची येणाऱ्या पावसाळ्याचे लहानपणी आम्ही कौतुक केले! हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा. पण दरवर्षीच्या बजेटातील नवनवे कर भरूनही आम्ही पुन्हा 'मतदान' करतोच. तेव्हा सृष्टीचं जाऊदे, आमचेच कौतुक कर बाळा! ◻ ◻ ◻



'ग्लोरिया' या गुरुनाथ धुरीच्या कवितासंग्रहास महाराष्ट्र शासनाचे केशवसुत पारितोषिक मिळाल्याचे वाचले आणि मला खूप आनंद झाला. एकतर गेल्यावर्षी सरकारने खत्रुडपणा केला होता. एकाही कवीस मानही आणि धनही दिले नव्हते. ते ह्यावर्षी टळल्याचा आनंद होता. धुरीच्या कविता वेगळ्या आहेत: 'ह्यावर्षीचा हा एक महत्त्वाचा संग्रह आहे' असे आपले म्हणणे खरे झाल्याची खुषी होती. गुरुनाथ माझ्या दोस्तांपैकी एक होता आणि कवितेच्या प्रेमाने त्याने स्वतः पैसे खर्च करून हा सुरेख कवितासंग्रह काढला होता. या सगळ्या गोष्टी मला लक्षणीय वाटत होत्या.

# एक अस्वस्थ तरुण कवी गुरुनाथ धुरी व ग्लोरिया

मुलाखत
केशव मेश्राम

त्याच्या लेखनविषयक आठवणींविषयी बोलताना तो म्हणाला, 'प्रथम केव्हा काय लिहिले हे सांगणे खूप कठीण आहे. कारण असे काही सांगितले, की त्याच्याही मागचे मला आठवू लागते ते सांगितले, की त्याही आधीचे आठवते आणि एकंदर काम अवघड होते. पण खूप लहानपणापासून मी लिहायच्या फंदात पडलो. आठवी नंतर वाचनाचे वेड वाढत गेले. त्यावेळी आम्हा तीनचार मित्रांचे टोळके होते, 'गाडगीळ-गोखले' यांच्या कथा खूप वाचल्या. तसे मराठी चौथीत असताना 'छोट्याच्या सहवासात' ही 'नवशक्ती'त पहिली बालकथा प्रसिद्ध झाली होती. पण आठवीत असतानाच किर्लोस्कर, शशी, वसंत वगैरे अंकांतून आमच्या कथा येऊ लागल्या होत्या, अर्थात कथा आमच्या नावांवर

होत्या पण आमच्या नव्हत्या. त्यांत आम्ही नव्हतो. भाषा, कल्पनाशैली वगैरे आमच्या आवडत्या लेखकांची होती. शांताराम खेडेकर, प्रभाकर पारेकर व चंद्रकांत खोत (मर्तिक) असे आमचे आठवीतले टोळके.

' बी. ए. ला आणि एम. ए. ला क्लास असताना प्राध्यापक व्हावे असे नाही का वाटले तुला ?' मी त्याला कुतुहलाने विचारले.

तो दोन मिनिटे स्तब्ध बसला. सिगारेटवर नवी सिगारेट पेटवून पुन्हा तो बोलू लागला. ' हे बघा, खरं म्हणजे मला मुंबई सोडायची नव्हती. पण आधीच मराठीच्या पोस्टस् कमी. माझ्या कॉलेजात म्हणजे ' कीर्तीला ' मी सांगून ठेवले होते. खूप वेळा सुचवले होते पण का कुणास ठाऊक, त्यांना माझ्यात ' इंटरेस्ट ' वाटला नाही. आम्ही बहुजनसमाजातले हेही येथे नडले. मग काहीतरी करायचे म्हणून सचिवालयात ' भाषा विभागात, प्रवेश केला.'

' मग एकदम दिल्लीला उडी कशी मारलीस तू ?'

घुरी माझा प्रश्न ऐकून भडकला. म्हणाला – उडी कसची ? माझे अस्तित्वच ' डायरोक्टरेट ऑफ लॅग्वेंजेसना ' जाचक वाटत होते. एका हस्तलिखिताचे हे ' प्रकरण ' असावे असा माझा कयास आहे. मी कंटाळून जाईन, बदनाम होईन, अशी पद्धतशीर योजना तेथे शिजवली गेली. आणि मी एकदा नाकारलेला ' कॉल ' असतानाही मला सचिवालयातून आणि मुंबईतून जवळजवळ सक्तीने हाकलूनच – ढकलूनच काढले. ' म्हणून मी दिल्लीकर, शरीराने. पण सारे धागे मुंबईतच !'

' पण दिल्लीचे वास्तव्य, राजधानीचे शहर, एकटेपणाचे अनिर्बंध स्वातंत्र्य, ' खावो-पिवो, कुछ भी करो ' आजच्या तरुणांना हवेसे सारे दिल्लीने तुला दिले असताना, तुला दिल्ली पसंत नाही; हे गमतीचे वाटते ?

माझ्या प्रश्नाने गुरुनाथ घुमा झाला, नव्या सिगारेटची राख झाडत तो म्हणाला, ' तुम्ही लोक दिल्लीबद्दल चांगले बोलू लागता आणि माझा जीव गुदमरू लागतो.

दिल्ली देशापेक्षा वेगळी आहे. मला वाटते, तेथला माणूस एका अभेद्य पारदर्शक काचेत वावरत असतो. देशात ' रॉयट ' होतात. दंगली होतात. नाना उत्पात घडतात. ते तेथून दिसतात पण ऐकू येत नाही. मानसिक कल्लोळ नाही. केव्हातरी डी. टी. यू. आणि विद्यार्थी जरा धमाल करतात एवढेच.

' दिल्लीला साहित्यिक स्नेही आहेत का ? ' मी त्याला त्रासलेला बघून आणखी एक प्रश्न केला.

' आहेत ना ! एका हाताच्या बोटावर मोजता येतील इतके. पण एकतर दिल्लीत ठिकाणाठिकाणात खूप अंतर. त्यामुळे कुठे जायचे म्हटले तर दीड-दोन

त्रास ताटकळावे लागते. मग कुठला सिनेमा, प्रदर्शने अन् गप्पा ? आणि आणखी एक. जसे एका गल्लीतल्या दादाला परका माणूस खपत नाही, तसे तेथल्या लोकांना दुसरा साहित्यिक टोचतो. त्यात काही थकलेभागले साहित्यिक आहेत. ते लेकाचे 'पेट्रनार्यझिंग अॅटिटचूड' घेतात. असे पराभूत लोक तुम्हाला पुढे आणण्याचे औदार्य दाखविण्याची 'पोझ' घेतात आणि शब्दांना धंद्याला बसवतात. बहुतेक लेखक 'स्टेट्स् कॉन्शस' असल्याने माझे त्यांच्याशी जमले नाही.

'अरे, पण एकही चांगला माणूस तुला दिल्लीत भेटू नये ?' आश्चर्य आणि अविश्वासाने मी त्याला प्रश्न केला.

तो हसला. 'असेच नाही काही ? एक भला माणूस मला मिळाला होता. वय, हुद्दा विसरून तब्येत लावून वाङमयावर बोलणारा, भटकणारा, दोस्ती करणारा. श्री. गं. रा. पटवर्धन आणि त्यांच्या सौभाग्यवती. पण त्यांची बदली झाली आणि मी पुन्हा एकटा ओसाडवाडीतला देव !

'ह्या परकेपणाची–ओसाडपणाची अनुभूती ग्लोरियातून दिसते. हा त्या अनुभवाचा चांगला भाग म्हणता येणार नाही का ?' मी त्यास विचारले.

'आहे ना ! पण आता त्यावर मी लिहून मोकळा झालो. आता तेच ते गिरवण्यात मजा नाही. तेथे कोणी दोस्त नाही. द्वेष करायला नाही. जेव्हा आपण खूप विचार करतो तेव्हा आपल्या आतल्या माणसाशी आपले भांडण चालू असते पण तेच ते ओसाडीचे काव्य आता थांबावे. मला वाटते अशा वेळी आपले रक्त चाटीत बसण्यातला आनंद आणि त्याचाही कंटाळा असा हा प्रकार. थोडक्यात म्हणजे दिल्लीतले दुःख 'गांडू दुःख' आहे.

'मुंबईहून काही साहित्यिक मित्र दिल्लीस आल्यावर भेटत असतील ना ? तेव्हा तर तू खूष होत असशील ?'

तुमच्यासारखे किंवा दुसरे कुणी तिकडे आले, की मला अख्खी मुंबई भेटीला आल्याचा आनंद होतो. पण इथले काही वयाने व नावाने (?) ज्येष्ठ लोक मला भेटले. पण त्यांनी हा आनंद मला मिळू दिला नाही. जणू काही तू ज्यूनिअर कवी आहेस. मला खाऊपिऊ घालणे, खंडणी देणे तुझे कर्तव्य आहे असे ते वागले. बऱ्यापैकी लेखक आणि भुक्कड अतिसामान्य माणूस असे मी त्याचे वर्णन करीन.

'ग्लोरिया' काढायची पूर्वतयारी खूप वर्षापासून का ?'

'नाही मेश्राम ! दिल्लीला गेल्यावर म. ल. वऱ्हाडपांडे–मी त्याला 'पांडे' म्हणतो–सारखा मला सतावू लागला आणि त्याच्या पराणीमुळे मी हलू लागलो. मी कविता खूप वर्षांपासून लिहितो आहे, पण मी 'करिअर' म्हणून लेखनाकडे पाहिले नाही. मग जुन्या फाईली, मित्रांना पत्रे लिहून माझ्याच कविता मला

जमवाव्या लागल्या. अलिबागला स्वत: बसून दादापुता करून छपाई वगैरे आटोपून घ्यावी लागली असा हा ग्लोरिया !'

'ग्लोरिया' बद्दल तुझे मत काय? लेखनाचे नवे संकल्प आहेत का?

'माझ्या दृष्टीने मी अत्यंत सोप्या भाषेत ही कविता लिहिली. कथनाचे प्रतिक-कथांचे माध्यम मी सोपेपणासाठीच निवडले. अशी कविता खूप सोपीही वाटते तरीही कठीण उरते आणि हे मी चांगल्या कवितेचे लक्षण मानतो. वेगवेगळ्या सर्व थरांतील लोकांकडून केंव्हातरी केंव्हातरी येणाऱ्या पत्रांमुळे ही कविता समजायला सोपी आहे हे मी जाणून घेऊ शकतो.

आतापर्यंतच्या अनेक अनुभवांवर एक १५० पानांचे काव्य लिहायचा माझा बेत आहे. 'प्रदीर्घ दु:खाची कविता असे नावही मी ठरवून टाकले. पण त्याआधी मला आणखी एक गोष्ट करायची आहे. महाभारतातले चित्रण मला मर्यादित वाटते. त्यापेक्षा ज्ञानेश्वरांचा अमृतानुभव ग्रंथ मला सर्वदृष्टीने 'ग्रेट' वाटतो. जोपर्यंत मानवी शरीर रचना एक सारखी आहे तोपर्यंत ते अनुभव प्रत्येकाला 'अनुभवता' येतील. हे वैश्विक व सर्वस्पर्शी प्रभावी लेखन 'फ्रीव्हर्स' मध्ये माझ्या संदर्भात मांडायची माझी इच्छा आहे.

'ग्लोरिया'त जी रेखाटने आहेत त्याने विशेष काय साधले?'

धुरी म्हणाला, मला माझ्या कविता कशा दिसतात याची ती एक वेगळ्या माध्यमातली प्रतिक्रिया आहे. मला प्रथम 'स्टॅटिक' चित्र दिसते. मग त्यात हाल-चाली होतात. त्या अनुभव समांतर येतात आणि उचलल्या जाऊन त्यांना कविता-रूप लाभते. तर काही चित्रे स्टॅटिकच रहातात. माझ्या मानसिक चित्रीकरणाचाच तो एक प्रयत्न म्हणता येईल.

'आजची मराठी कविता, कवी व टीकाकार यांच्याबद्दल तुला काय म्हणावेसे वाटते?' मी त्याला प्रश्न केला.

कविता हा एक झपाट्याने पुढे जाणारा गतिमान वाङ्मयप्रकार आहे. मराठी कवितेला खप मोठे भवितव्य आहे. मराठीत काही कवींना एक नंदनवन सापडले आहे. बालकवी, शंकर रामाणी, ना. धो. महानोर यांच्याबद्दल असे म्हणता येईल, पण ते तेथेच अडकले. त्यांच्यात वाढच नाही. पुढे काही घडत नाही. घडलेसे वाटत नाही. म. म. देशपांडे 'स्यूडो फिलॉसॉफिकल' कवितांत अडकून वाया गेले. काही लोकांचे संग्रह निघायला पाहिजेत. अ. वा. कुलकर्णी, रमेश तेंडुलकर, पुरुषोत्तम पाटील, सुरेश मथुरे वगैरे. आणि काही कवी मला खूप आवडतात. शरद साटम, केशव मेश्राम, वृंदा लिमये, ग्रेस, अंजलि ठकार हे विशेष. नामदेव ढसाळ आता बिघडत चालला आहे. कवी म्हणून तो अनेक युक्त्या वापरू लागला आहे.

चांगली टीका माधव आचवलांनी इंदिरा संत यांच्या कवितेवर केली होती. तशी असावी. ती विजया राजाध्यक्षांनी ना. धो. महानोर यांच्यावर जसे लिहिले होते, इतकी वाईट कधीच नसावी असे मला वाटते.

'धुरी, आता पुढे काय काय करायचे आहे?' मी त्याला अखेरचा प्रश्न विचारला.

'काय सांगू ? दिल्ली मला मुळीच आवडत नाही. नोकरी सोडून मुंबईत आलो, तर दीड-दोनशे रुपये स्वत:पुरते मिळवता येतील का ? याचा विचार करतो आहे. खूप वाईट अनुभव येतात. प्रत्येक अर्ज पराभवच पदरात टाकतो. तरी धडपड करणार आहे. अगदीच अशक्य झाले तर माझा एक दोस्त आहे. बंडू दाभोळकर. त्याचा 'मराठी-सिंधी' संसार चांगला चालला आहे. तुमचाही 'मराठी-गुजराती' संसार व्यवस्थित चालल्याचे कित्येक वर्षे बघतो आहे. नाहीतर दिल्लीतच मराठी-पंजाबी' संसार थाटायचा माझा विचार आहे. चांगली आहे माझी मैत्रीण !' बोलता बोलता धुरी थबकला. सिगारेटचे अख्खे पाकीट तीन-साडेतीन तासांत संपले होते. दोन-तीनदा चहाही झाला होता. त्याला निरोप देऊन आम्ही आपापल्या वाटांनी निघालो. ◘

---

## यात्रा

कुणी कोंडून ठेवलं मला ह्या प्रचंड महालात सर्व दरवाजे बंद करून ? कधी ?
फिरलो वर्षानुवर्षं आंधळ्यासारखा चाचपडत दालनादालनातून
कधी सैराट धावत सुटलो चिडून, आदळलो भिंतीवर, कोसळलो
पण कधीच पडता आलं नाही मला बाहेर. कधीच घेता आले नाहीत

प्रकाशाचे स्वच्छ मोकळे श्वास मला. मी पाह्यली फक्त प्रकाशाची भव्य स्वप्नं
आणि ऐकलं रक्ताचं गर्जित संगीत होऊन वाहणारं रक्तवाहिन्यातून
उत्तरोत्तर शबल केल्या माझ्या शक्ती त्या महालातील काळोखानं
आणि अगतिकतेच्या तळघरात लोटून दिलं कायमचं.

आपटलं मस्तक थडथडा दगडी भिंतीवर, तेव्हा हाताला धरून
कोणी आणून उभं केलं महालाच्या प्रचंड कमानी दरवाजात
कोणी दाखवली हिरवीगार कुरणं उलगडत गेलेली क्षितिजापर्यंत ?
...किती दयार्द्र झुकलेलं आकाश होतं वर अन् तळपणारा सूर्य, त्यात–

पाह्यले मी पांढऱ्या शुभ्र पंखाचे देवदूत लयीत नाचणारे
सूर्याभोवती फेर धरून. ऐकलं त्यांचं दैवी संगीत अन् हरवून सारं भान

गेलो धावत हिरव्यागार कुरणातून. प्रथमच घेतले प्रकाशाचे स्वच्छ मोकळ श्वास
हृदय भरून, अन् विनवलं दोन्ही हात पसरून त्या देवदूतांना–

" अरे मलाही नाचायचं आहे सूर्याभोवती तुमच्यासारखं. द्या ना मला
तुमच्यासारखेच सुंदर अन् शक्तिशाली पंख
मलाही येऊ द्या उडून तुमच्यात "
...पण माझी प्रार्थना गेली हवेतच विरून, घुसमटून


हळूहळू झाली रात्र. दिसेनाशी झाली कुरणं, दिसेनासा झाला सूर्य,
सर्व देवदूत. तेव्हा कोणी उठवलं मला हलकेच हाताला धरून ?
कुणी नेलं महालात पुन्हा ?...कुणी...?...कुणी...?
अन् प्रथमच पाह्यले मी, दरवाज्याच्या कमानीतून आत शिरताना,

सर्व दिवे उजळलेले, सर्वत्र लखलखाट हंड्याझुंबरांचा
रत्नखचित मेजदीपातून विस्फारलेले प्रकाशाचे दैदिप्यमान स्रोत
त्या प्रकाशात प्रथमच दिसली मला भिंतीभिंतीवर रेखाटलेली भव्य चित्रं–
लढायांची अन् रक्तपातांची, प्रेमाची अन् द्वेषाची.

प्रथमच पाहिल्या मी दालनादालनांच्या भिंतीवर रेखाटलेल्या
विलासाच्या नी सर्वनाशाच्या सर्व अवस्था. भीषण संहार अन् त्यातूनही
उभं राहणारं मानवी जीवन.
चालत जाताना दुतर्फा चित्रांच्या रांगारांगातून–

जागा झाला माझ्या शरीराच्या अणुरेणूत त्या महालाविषयी गाढ जिव्हाळा
पटली माझ्या परिसीमांची ओळख.
.. कुणी उजळले हे दिवे अन् घडवली मला ही अद्‌भुत यात्रा
कोण दाखवतंय जन्मापासून हे अमानुष क्रौर्य अन् अमानुष प्रेम माझ्यावर ?

ग्लोरिया, (पृष्ठ ३६–३७)






पांडुरंग धवल

काहीही कारण नसताना परिणाम असणं आणि उपभोग नसलेलं शरीर असणं, किती दुर्दैवाचं आहे नाही ?

डॉक्टरांची शोधक नजर आणि अज्ञाताचा धागा हुडकण्यासाठी माझ्या तोंडावर फेकलेला त्यांचा हा प्रश्न; माझं डोकं सुन्न करून जात होता. माझी वाचा बंद झाली नव्हती. शेजारी दगडी पुतळ्याप्रमाणे बसलेल्या माझ्या पत्नीला, मी

पाहूही शकत होतो हेच एक माझं सुदैव होतं. निदान अगदी याक्षणी तरी ! पण–काचेची बुबुळं असलेल्या डोळ्यांना सौंदर्याचा प्रश्न विचारावा; लाकडी पायाच्या ठोकळ्यावरून मायेचा हात फिरवल्यावर, दुःख हलकं झाल्याचं मानावं! किती भयानक कल्पना ! नियतीचा किती क्रूर निर्णय !

केविलवाण्या चेहऱ्यानं मी डॉक्टरांच्या तोंडाकडे पहातच राहिलो. माझ्या कानावर पुन्हा शब्द आले.

"सांगा ना ! आठवण करून सांगा ! अशा तुमच्या शिथिल इंद्रियाच्या अवस्थेचं एखादं तुम्हालाही क्षुल्लक वाटणारं कारण ! व्यथा, आघात, संवेदना, दडपण, अप्रिय घटना !"

"पण डॉक्टर ! उघडच्या नागडच्या सत्याला पेहराव घालण्यासारखं काही घडलंच नाही !" मी थंडपणे बोललो.

माझी उलट तपासणी करण्यानं काही निष्पन्न होत नाही असं दिसून येताच, डॉक्टर खिन्न झाल्यासारखे दिसले. पण माझा नाइलाज होता. दैवाचा आलेख मी नाकारू शकत नव्हतो. आणि नियतीनं माझ्या पदरात बांधलेल्या परिणामांचं कारणही मी देऊ शकत नव्हतो. माझ्या जीवनात कसलेही रहस्य नव्हते. दोन वर्षांपूर्वी लग्न होईपर्यंत आणि मीलनाच्या पहिल्या रात्रीपर्यंत माझ्यात पौरुषत्व नसल्याची कसलीही खूण मला दिसली नव्हती. माझ्या इच्छा शक्तीचा आदेश माझे इंद्रिय मुळीच मानीत नसल्याचं, आयुष्यात पहिल्याप्रथम आणि तेही तरुण पत्नीच्या देखतच मला कळून चुकलं होतं. पक्वान्नाच्या ताटावर अधिकारानं बसणाऱ्याच्या थोबाडीत मारून त्याला पानावरून उठविलं, तर त्याला मरणप्राय दुःख होणार नाही का ?

तसंच माझंही झालं होतं !

मानवी जीवनातील अत्युच्च सुखाच्या, एकाच क्षणासाठी माझ्या देहातला कण न कण आसुसला होता. पण राजाचा आदेश झुगारून देणाऱ्या साध्या हुजऱ्याप्रमाणं माझ्या शरीरेंद्रियानं माझ्या चेतनेची दखलच घेतली नव्हती. माझ्या सुरूप, सुशील आणि सुशिक्षित तरुण पत्नीसमोर माझी भयानक मानखंडना झाली होती. मी एक वेळ काचेचं बुबुळ, दाताची कवळी आणि लाकडी पाय घेऊन जगू शकलो असतो. पण–पण ही आयुधे केवळ मा-य'चसाठी राहिली असती. माझ्या पत्नीला त्यापासून सुखदुःख मिळणारे नसले तरी माझं व्यंग, ती सहन करू शकली असती. धर्मेच, अर्थेच, कामेच, अशी शपथ घेऊन देवाब्राह्मणांच्या आशीर्वादानं, मी तिच्याशी लग्न केलं होतं. त्या तीन शपथांपैकी एक शपथ पाळण्यास मी असमर्थ ठरल्याचं पाहून पत्नीनं कुठल्या कोर्टात दाद मागावी ? कुणाच्या शापानं माझं जीवन मातीमोल झालं होतं ?

आता उपचार तपासणीच्या उद्देशानं आम्ही आलो नव्हतो. माझ्या अवस्थेच्या

शिक्कामोर्तबाचं चिटोरं पत्नीच्या पदरात टाकावं म्हणून मी इथे आज आलो होतो. पण त्या गोष्टीची सुरुवात करायला माझी जीभ रेटत नव्हती. विनयीभावनेनं मी त्यांना म्हटलं,

" डॉक्टरसाहेब ! माझ्या पत्नीला आशीर्वाद देण्याचं एक शेवटचं काम आपण करावं, म्हणून विनवण्यासाठी मी आज आलो होतो ! मला आता तपासणी नको नि उपचारही नको. "

" म्हणजे ?"

" म्हणजे, दोन वर्षं लैंगिक सामर्थ्य मिळविण्याच्या खटपटीत बायकोला झुलवीत ठेवण्यापेक्षा, घटस्फोटाचा मार्ग तिला मोकळा करून द्यावा–" पुढचे शब्द न उच्चारता पत्नीची प्रतिक्रिया तपासावी या उद्देशाने मी तिच्या चेहऱ्यावर दृष्टी रोखली.

जिभेचा कानवला करून दातांखाली चावीत, ती शून्यपणे पहात बसली होती. तिच्या अंगावर कसलेही अलंकार नव्हते. कान, गळा, हात एकदम बुच्चे होते, तरी तिचं रूप कुणाही तरुणाला आवाहन करणारं, रेखीव शिल्पाप्रमाणं होतं. डॉक्टरांनी तिला पूर्वी सोन्या-मोत्याच्या दागिन्यांत पाहिलं होतं. तिचा हेतुपूर्वक बदलही त्यांच्या लक्षात आला असावा. निरुत्साहाचा सुस्कारा टाकीत डॉक्टर म्हणाले,

' असं ! म्हणूनच अलंकारांची अगोदरच फारकत झालेली दिसतेय ! '

पण यावर कुणीच काही बोललं नाही. निर्णय घेण्यासाठी अंतर्मुख होऊन डॉक्टरांनी मान खाली घातली. अक्षम्य पराभव कबूल करून थंडगार गात्रांनी मी उगीचच चुळबुळ करीत होतो. तेवढ्यात कडवट चेहरा करून पत्नीनं तोंड उघडलं !

" नवरा हे स्त्रीचं पहिलं भूषण. तो मौल्यवान अलंकार मातीमोल झाल्यानंतर, आत्म्याच्या तळतळाटाचे अलंकार तरी काय कामाचे ? त्या ऐवजामुळं त्यांची पोटाची भूक तरी बरीच वर्षं भागेल. माझी भूक – ! "

पत्नीला भडभडून आलं. तिनं आयुष्यात पहिल्याच पुरुषावर प्रेम केलं होतं. पण ती उपासानं वखवखलेली होती. कुलशीलवान तरुण विधवा स्त्रीचं दु:ख, तिच्या डोळ्यांतून वहात होतं. तिच्या मनोभंगाचा हुंदका माझ्या छातीवर वज्रासारखा आदळला.

त्यामुळे डॉक्टरांचे डोळेही पाणावले. राख, लोखंडाचा कीस आणि मातीच्या मिश्रणातून तिन्ही वस्तू सहजपणे अलग कराव्यात, त्या तत्परतेने डॉक्टरांनी हळूच प्रश्न केला.

" आत्म्याच्या तळतळाटाचे अलंकार, आणि बरीच वर्षं भागणाऱ्या पोटाच्या भुकेचा कोणत्या संदर्भात उल्लेख केलात, ते जरा सविस्तर सांगू शकाल का ?"

डॉक्टरांच्या मनोविश्लेषणात्मक खोचक प्रश्नाने चमकून जाऊन आम्ही एकमेकां-

कडे कावऱ्याबावऱ्या नजरेनं पाहिलं.

खुलासा करण्याच्या उद्देशानं मी लगेच म्हटलं.

"डॉक्टरसाहेब ! माझ्या व्यथेशी त्या घटनेचा, काहीही संबंध नाही, पण ओघानेच आलं म्हणून सांगतोच मी–!" अशी सुरुवात करून एक कौटुंबिक विश्वासघाताची घटना मी त्यांना सविस्तरपणे सांगितली.

आमच्याकडे मागं एक ब्राह्मण आचारी होता. अविवाहित, सच्छील, पाशरहित भिक्षुक होता तो. पंधरा वर्षांत त्यानं आमच्या वडिलांना आपला पगारदेखील मागितला नाही. उलट अवांतर मिळकतीचे पैसेही तो विश्वासानं वडिलांच्याच हवाली करीत असे. उतार वयात संपूर्ण तीर्थयात्रा करावी या उद्देशानं त्यानं आपल्या सर्व पैशांची मागणी केली. हिशेब केल्यानंतर त्याची ठेव १०–१२ हजारापर्यंत गेल्याचं पाहून, आमच्या घरी त्याच सुमारास चोरी झाल्याचं निमित्त पुढं करून, वडिलांनी त्या गरीब ब्राह्मणाची ठेव गिळंकृत केली. माझं लग्नही त्याच वेळी थाटामाटानं पार पडत होतं. आचारी धरणं धरून बसला होता. पैसे मिळविण्यासाठी अकांडतांडव करीत होता. पण अविश्वासाच्या आघातानं थोड्याच दिवसात त्याचं डोकं फिरलं. माझ्या लग्नात वडिलांनी त्याच्या पदरात, भिकाऱ्याला वाढल्याप्रमाणं उष्टेमाष्टे लाडू घातलेले मी पाहिले. त्यावेळी 'तुझं वाटोळं होईल' असं, त्यांना बजावून तो मुकाट्यानं निघून गेला. त्याच रात्री पत्नीच्या पहिल्यावहिल्या प्रेममीलनाची मी आतुरतेनं वाट पहात होतो. उंची वस्त्रालंकारांनी




भारावलेली माझी पत्नी लाजत मुरकत माझ्या खोलीत आली होती. तिच्या अंगो-पांगावरून आतुर भोगतृष्णेचा हात फिरवीत असताना मला वाटलं माझ्या आयुष्याच्या सोबतीची ठेव वडिलांनी गिळंकृत केलेल्या पैशातून नटूनथटून उपभोगा-साठी यावी, त्यापेक्षा नामुष्कीची, नादानपणाची, माझ्या परावलंबितेची दुसरी गोष्ट कोणती असू शकेल ? पण मी तो विचार दुसऱ्याच क्षणी झटकून टाकला. कारण एकत्र कुटुंबातला मी हक्काचा वारसदार होतो. पण – पण अकृत्याचा मीही भागिदार आहे अशी भावनाच मला स्पर्शू शकली नाही. माझ्या गात्रांना आलेला थंडपणा जाण्यासाठी मी त्या रात्री खूप उपायही केले. पण– पत्नीची पहिली वहिली इच्छा मी माझ्या लुळ्या झालेल्या शरिरानं पूर्ण करू शकलो नाही.

माझ्या दृष्टीनं क्षुल्लक वाटणारी ही घटना ऐकताच डॉक्टर खुर्चीत सावरून बसत अधीरतेनं म्हणाले;

"आता कुठं आहे तो आचारी ?"

"मला वाटतं तो सरकारी दवाखान्यात पडून असावा." पूर्वीच्याच थंडपणानं मी उत्तर दिलं. पण डॉक्टरांना त्यात मोठा आशय असल्याचा भास झाल्यामुळंच की काय, पटकन् त्यांनी माझा हात हातांत घेत म्हटले.

"हे पहा महाशय! मला आणखी एका प्रयोगाची तुम्ही संधी द्या. आणि मी सांगेन त्याप्रमाणं करा. त्या भिक्षुकाला भेटा, त्याला बरं करा, त्याचे पैसे द्या. आशीर्वाद घ्या!"

बावळटासारखा चेहरा करून मी त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलं. प्रयोगाचं प्रश्न चिन्ह माझ्या व पत्नीच्या चेहऱ्यावर सारखंच उमटलं होतं. 'काय चमत्कारिक डॉक्टरी सल्ला' अशा अर्थाचा चेहराकरून जड मनानं आम्ही डॉक्टरांचा निरोप घेतला.

आणि काय आश्चर्य! आचाऱ्याला बरा करून, त्याच्या धोतरात त्याची ठेव व्याजासकट बांधून आम्ही त्याच्या पाया पडलो.

त्या रात्रीच माझं गेलेलं पौरुषत्व मला परत मिळालं. पण एका आशीर्वादानं मिळालेला जीवनातल्या अत्युच्च आनंदाचा ठेवा, ही आता कुणाला उघड न सांगण्यासारखी माझी एक खाजगी बाब आहे! नाही का ?



# संभाजी महाराजांवरील मराठी ऐतिहासिक नाटके



पूर्वार्ध

भीमराव कुलकर्णी

छत्रपती संभाजी महाराजांवर किती मराठी नाटके लिहिली गेली असतील असे तुम्हाला वाटते ? हा प्रश्न अनेक जाणकारांना विचारला, तेव्हा दहा-पंधरापेक्षा ती अधिक असतील असे कोणाचे मत दिसले नाही. मग मी त्यांना 'संभाजी'-विषयक मराठी नाटकांची एक यादीच सादर केली.

'गुणोत्कर्ष' वा. वा. खरे (१८८५); 'सं. संभाजी' आ. मो. पाठारे (१८९१); 'सं. छत्रपती संभाजी' सोनाबाई (१८९६); 'प्रणयी युवराज' वा. न. शहा (१९१७); 'मराठ्यांचा आत्मयज्ञ' नाथमाधव (१९१७); 'सं. राजसंन्यास' रा. ग. गडकरी (१९२२); 'राजसंसार' वि. वा. हडप (१९२३); 'बेबंदशाही' वि. ह. औंधकर (१९२४); 'दुर्दैवी छत्रपती' शं. गो. घैसास (१९२५); 'प्रतिज्ञा–कंकण' मा. आ. कामत (१९२७); 'गोमांतक–विजय' त्र्यं. वि. वैद्य (१९२७); 'राजसंन्यास नाटकाची पुरवणी' द. स. सुळे (१९३०); 'रक्तरंगण' कृ. बा. भोसले (१९३०); 'रायगडची राणी' वि. वा. हडप (१९३१); 'शिवाजीला शह' य. ना. टिपणीस (१९३३); 'मराठ्यांचा राजा' मालती तेंडूलकर (१९३७); 'सं. छेडलेला छावा' वि. ना. कोठीवाले (१९३४); 'धर्मवीर संभाजी' ग. कृ. बोडस (१९४१); 'सूडाची प्रतिज्ञा' भि. ना. देसाई (१९४३); 'चिडलेला छावा' श्रो. कृ. ओक (१९४५); 'थोरातांची कमळा' ना. के. सोनसुरकर (१९५१); 'शककर्त्यांचा न्याय' मा.

आ. कामत (१९५२); 'रणसम्राट' सी. गो. प्रभू (१९५२); 'मानी मराठा' ना. घ. कोचरेकर (१९५०); 'मराठ्यांची स्वामिभक्ती' अ. रा. राणे (१९५४); 'अमर जहाले छत्रपती संभाजी' आबासाहेब आचरेकर (१९५७); 'स्वप्न भंगले रायगडाचे' विनोदकुमार शेडगे (१९६१); 'राजनिष्ठा' बी. एन. सामंत (१९६१); 'रायगडाला जेव्हा जाग येते' वसंत कानेटकर (१९६२); 'छत्रपती संभाजी' ल. वि. सांडव (१९६४); 'राजयाचा पुत्र अपराधी देखा' द. ग. गोडसे (१९६४); 'महाराष्ट्राची दौलत' वि. शं. जोशी (१९६४) 'मोहरा इरेला पडला' आ. वि. दळवी (१९६५); 'महाराष्ट्राचा मोहरा' सीमा साखरे (१९६६); 'अश्रू ढळले रायगडाचे' अर्जुनराव झेंडे (१९६७) 'सती गोदावरी' शं. ब. चव्हाण (१९६७); 'मृत्यू वाकला शंभूपुढे' राजाराम परब (१९६७); 'मराठ्यांचे शंभु महादेव' वि. शं. जोशी (१९६७) इथे ओशाळला मृत्यू' वसंत कानेटकर (१९६८); 'सह्याद्री सांगे कथा शंभूची आबासाहेब आचरेकर (१९६८); स्वराज्याचा नंदादीप, सी. गो. प्रभू (१९६९).

'छत्रपती संभाजी' विषयक पहिले महत्त्वाचे ऐतिहासिक नाटक लिहिणारे नाटककार म्हणून आत्माराम मोरेश्वर पाठारे यांचा उल्लेख करावयास हवा. पाठाऱ्यांच्या पूर्वी प्रसिद्ध इतिहास संशोधक वासुदेवशास्त्री खरे यांनी 'गुणोत्कर्ष' नावाचे नाटक लिहिले होते, परंतु या नाटकाचा नायक संभाजी नसून शिवाजी आहे. नाटक चटकदार असून ऐतिहासिक दृष्ट्या ते फारसे महत्त्वाचे नाही. कारण पन्हाळगडचा किल्लेदार गणपतराव याच्या नादाने अत्यंत नादान व दुष्ट बनलेल्या संभाजीचे एक काल्पनिक चित्र यात रेखाटण्यात आले आहे. शिवाजी दक्षिण-दिग्विजयार्थ गेला असता त्यांचा पुत्र संभाजी व पन्हाळगडचा किल्लेदार गणपत-राव हे मोगलांस फितूर झाले आहेत, ही वार्ता कळल्यानंतर तो घाईघाईने मोहीम सोडून कर्नाटकातून महाराष्ट्रात परत येतो, परंतु ह्या कथाभागांचे राजकीयदृष्ट्या जे महत्त्व आहे त्याचा विचार न करता अद्भुतरम्य अशा प्रकारचे हे नाटक शास्त्रीबुवांनी लिहिले आहे. दुष्ट गणपतराव व नादान संभाजी यांची जशी या नाटकात चित्रे आहेत, तशीच, शिवाजी वडगावचा सुभेदार जिवाजीपंत देशपांडे यांजकडे वेषांतर करून धर्म्याच्या रूपाने राहतो व वडगाववर येणारा दुष्ट गणपतरावाचा हल्ला एकट्याच्या पराक्रमाने परतवून लावतो किंवा गणपतराव व संभाजी दुष्टपणाने सुभेदाराच्या सुनेवर बलात्कार करावयास टपले असता त्या पतिव्रतेची या संकटातून शिवाजी सुटका करतो व दोघांनाही शिक्षा करतो, अशी अद्भुतरम्यतेच्या रंगाने रंगलेली चित्रेही आहेत. स्कॉटच्या 'आयव्हॅनो' या कादंबरीतील काही प्रसंगांचे व त्याच्याच 'लेडी ऑफ दि लेक' या कथाकाव्यातील काही भागांचे शास्त्रीबुवांनी येथे कलम केले आहे, हे लक्षात येते.

१८९१ साली प्रसिद्ध झालेले आत्माराम मोरेश्वर पाठारे यांचे 'सं. श्रीछत्रपती

संभाजी नाटक ' हे संभाजीवरील पहिले महत्वाचे नाटक. याही नाटकात संभाजीच्या दुर्वर्तनाचेच चित्र आहे, परंतु या नाटकाचा नायक आहे संभाजी. शिवाजी हयात असतानाच संभाजीच्या दुर्वर्तनाने कशी उचल खाल्ली होती व त्याचीच परिणती संभाजीच्या अनेक प्रकारच्या दुष्कृत्यांत कशी झाली, हा या नाटकाचा मुख्य विषय. संभाजीने शिवाजीचा एकनिष्ठ व महाबलवान सेवक हिरोजी फर्जंद याला कुस्तीमध्ये कपटाने ठार केल्याने सूडबुद्धीने पेटलेला त्याचा मुलगा येसाजी व मुलगी तुळसा ही वरकरणी संभाजीशी गोड बोलून आतून त्याचा काटा काढण्यास टपलेली आहेत आणि त्यांच्या प्रयत्नामुळेच संभाजी मोगलांच्या हाती सापडतो असे या नाटकात दाखविले आहे. संभाजीचा एकनिष्ठ सेवक जोत्याजी त्याच्याबरोबर सावलीसारखा वावरतो. परंतु त्याच्या कळकळीच्या आवाहनाचा काही उपयोग होत नाही. संभाजीच्या एकेका कृत्याने हाय खाऊन शिवाजी मरण पावतो आणि संभाजीच्या अनन्वित कृत्यांना ऊत येतो. शिवाजी हयात असेतो, संभाजीच्या कृत्याचे वर्णन करणारे तीन अंक आहेत आणि त्याच्या मृत्यूनंतर येसाजी-तुळशी यांनी संभाजीला पागल बनवून त्याचा बळी दिला, यासाठीही तीनच अंक आहेत. शेवटच्या सातव्या अंकात संभाजीच्या शिरच्छेदाचा प्रसंग आहे.

संभाजीच्या नादानपणाचे एक कमालीचे भडक चित्र, असे या नाटकाचे थोडक्यात वर्णन करता येईल. तामसी प्रवृत्तीचे हे एक उद्वेगजनक थैमान आहे. ते लोकप्रिय करण्याच्या दृष्टीने नाटककाराने सर्व तऱ्हेच्या क्लृप्त्या वापरलेल्या आहेत. तात्कालीन संगीत नाटकातील महत्त्वाची व हटकून यशस्वी ठरतील अशा चालींची विपुल पदे व लावण्या त्याने योजिलेल्या आहेत. संभाजी-तुळशी व संभाजी-शहाजादी यांचे प्रेमप्रसंग आहेत आणि शेवटी संभाजीचे हौतात्म्य आहे. मात्र हौतात्म्याने संभाजीचे दुर्गुण झाकले जातील अशी उदात्ततेची पार्श्वभूमी त्याने दिलेली नाही. त्याला या प्रसंगाचे फारसे कौतुक नाही. औचित्याचा व ऐतिहासिक वातावरणनिर्मितीचा अभाव यांमुळे अद्‌भुतरम्य युगास साजेशी हीही एक रंजक कृतीच ठरते.

## सोनाबाई केरकरीण

पाठाऱ्यांच्या कृतीपेक्षा पंधरा वर्षांच्या एका कुमारिकेने—सोनाबाई केरकरीण हिने लिहिलेली या कालखंडातील संभाजीच्या जीवनावरील नाट्यकृती किती तरी वरच्या दर्जाची ठरेल. ६ नोव्हेंबर १८८० रोजी जन्मलेल्या या मुलीला १७ जुलै १८९५ रोजी मृत्यू आला. तिने १८९४ साली ' संगीत छत्रपती संभाजी नाटक ' लिहिले आहे व ते तिच्या मृत्यूनंतर १८९६ साली प्रसिद्ध करण्यात आले आहे. १४–१५ व्या वर्षी तिने नाटक लिहिले आहे. परंतु त्या युगाच्या मानाने हे नाटक चांगलेच पक्व बुद्धीचे व सुजाण कलादृष्टीचा प्रत्यय देणारे आहे. ' संभाजी नाटका-पासून विचार करण्यासारख्या काही गोष्टी ' या नावाचा तिने लिहिलेला निबंध

या नाटकाच्या शेवटी जोडलेला आहे. त्यामध्ये संभाजीच्या व्यक्तिमत्त्वाचा तिने केलेला विचार खरोखर अतिशय कौतुकास्पद आहे. मराठ्यांच्या इतिहासाचे तिचे त्यामधून चिंतन दिसते.

पाठारे आणि केरकर या दोघांच्याही कृती काव्येतिहाससंग्रहात प्रसिद्ध झालेल्या संभाजी व राजाराम यांच्या चरित्राच्या, मल्हार रामराव चिटणीसकृत बखरींच्या, अवलोकनाने सिद्ध झालेल्या आहेत. पण या बखरींचा उपयोग करताना पाठाऱ्यांच्या कृतीत मुख्यत्वेकरून अभाव जाणवतो तो साक्षेपाचा. हा साक्षेप सोनाबाईच्या कृतीत दिसून येतो. सोनाबाईने निर्माण केलेल्या संभाजीमध्ये सारे दुर्गुण आहेत. परंतु तो भडक व व्यक्तित्वविरहीत असा केवळ नादानपणाचा पुतळा वाटत नाही. जामदारखान्यातील त्याने नेलेल्या वस्तूंबद्दल हिरोजी फर्जंदने केलेल्या चुगलीमुळे तो मनात डूख धरून बसतो आणि त्याच्या भावना समजावून न घेता शिवाजीने त्याला कठोर शिक्षा केल्यामुळे तो अंतर्यामी दुखावला जातो.

कुस्तीच्या डावपेचांबद्दल बरीच ख्याती असलेल्या हिरोजी फर्जंदास आव्हान देऊन तो त्याचा निःपात करतो. यामध्ये त्याने साधलेला सूड हा कपटाचा नसून त्याच्या पराक्रमाचा निदर्शक होता. परंतु त्याचे कौतुक कोणी करीत नाही. उलट त्याच्या हूडपणाबद्दल त्याला त्याच्या आईवडिलांची व मंत्रिमंडळाची सारखी बोलणी खावी लागतात. त्यामुळे तो लहानपणापासूनच स्वतःच्या घरापासून तोडला जातो आणि सूडबुद्धीने पेटलेल्या येसाजी-तुळशी ह्या बहीणभावांच्या संगतीत रममाण होऊ लागतो. कोकणात जंजिऱ्याच्या सिद्दीवर मोहीम करण्याची कामगिरी त्याजवर सोपविली जाते. या मोहिमेत त्याने दाखविलेल्या अभूतपूर्व पराक्रमावर पाणी पडते ते गोदावरी प्रकरणामुळे. मोहिमेमध्ये सापडलेली ही विप्रकन्या त्याला उपदेश करायला लागते, त्याच वेळी तो चवताळतो आणि तिच्यामुळे भर दरबारात त्याची जी निर्भर्त्सना होते, त्यामुळे त्याचे व त्याच्या नात्यागोत्याचे सारे भावबंध पूर्णपणे दुरावतात. असा हा 'एकाकी' पडलेला संभाजी कलुषाच्या नादाने व्यसनी बनतो. या नाटकातील संभाजीच्या व्यक्तिरेखेचे धागेदोरे असे तर्कसंबद्ध आहेत. त्यामुळे येथे संभाजीबद्दल, त्याच्या दुर्दैवाबद्दल नितांत सहानुभूती वाटते. संभाजी-येसूबाई यांच्या प्रवेशातील हृद्यता संभाजीच्या खऱ्याखुऱ्या मनाची प्रचिती देते. शेवटचा हौतात्म्याचा प्रवेश कमालीच्या नाट्यपूर्णतेने व उदात्ततेने भरलेला आहे. सारी पदे किर्लोस्करांच्या चालीची आहेत आणि तितकीच प्रासादिक व गोड आहेत. द्वंद्व गीतांचीही प्रसंगी जोड देण्यात आली आहे. भाषा प्रौढ, सूचक व नाट्यपूर्ण आहे. विशेष म्हणजे बहुतेक पदे कथानकाशी एकजीव झाली आहेत.

सोनाबाई ही मराठीतील पहिली नाटककर्ती. पंधराव्या वर्षी तिच्या हातून इतकी सफाईदार प्रगल्भ कृती निर्माण व्हावी हे मोठेच आश्चर्य! तिचा अकाली मृत्यू हे मराठी रंगभूमीचे फार मोठं दुर्दैव!! मराठी नाट्यवाङ्मयात तिने

दाखविलेला साक्षेप हा केवळ अपवादभूतच ठरला. नाटयाचार्य देवलांनी किर्लोस्करांची परंपरा समर्थपणे चालविली. सोनाबाई हयात असती तर ही परंपरा आणखी चांगल्या रीतीने पुढे चालू राहिली असती, याचा प्रत्यय तिच्या एकुलत्या एक नाटचकृतीने दिला आहे.

## पहिली नाटककर्ती

पाठाऱ्यांच्या नाटकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. बहुतेक नाटक-मंडळयांनी त्याचे प्रयोग केले आणि शेवटी सरकारने ह्या नाटकाच्या प्रयोगावर बंदी घातली व नाटक जप्त केले. त्यामुळे लेखकाचे नाव अनेक वर्षे महाराष्ट्रात दुमदुमत राहिले. सोनाबाईच्या वाटयाला यातले काहीही आले नाही. तिचे नाव दुर्लक्षित राहिले. मराठीतील पहिली नाटककर्ती म्हणून हिराबाई पेडणेकरणीचे नाव जाणत्यांकडून अनेक वर्षे घेण्यात आले आहे. तो मान सोनाबाईचा होय.

सोनाबाईनंतर मराठी ऐतिहासिक नाटकांच्या क्षेत्रात नाटचाचार्य खाडिलकरांचे युग सुरू झाले. खाडिलकरांनी शेक्सपियरच्या शोकात्मिकेच्या अभ्यासाने मराठी ऐतिहासिक नाटकांना कलाटणी देण्याचा फार मोठा प्रयत्न केला.

शेक्सपियरच्या प्रभावाने आपल्या कृतींना दारूण शोकनाटचाची एक विशिष्ट उंची गाठण्याचा प्रयत्न खाडिलकरांनतर फक्त एका गडकऱ्यांचाच काय तो होय. सामाजिक नाटकांच्या बाबतीत 'एकच प्याला' ह्या नाटकात गडकऱ्यांच्या प्रतिभेने हा चमत्कार करून दाखविला. 'राजसंन्यास' ह्या एकुलत्या एक ऐतिहासिक नाटकामध्येही गडकऱ्यांनी असाच एक महत्त्वाकांक्षी प्रयोग केला आहे. संभाजीचे इतिहासातील चित्र शोकपर्यवसायी होतेच, परंतु चिटणीस–बखरीतील त्याच्याबद्दलच्या आख्यायिकेने संभाजीला हौतात्म्य प्राप्त करून देण्याची दृष्टी आत्माराम मोरेश्वर पाठाऱ्यांच्या, म्हणजे संभाजीविषयक मराठीतल्या पहिल्या, नाटकापासूनच सुरू होती. त्याच्या दुर्गुणामुळे त्याला शासन झाले हे जरी खरे असले, तरी 'प्राणांतीही स्वधर्म व स्वाभिमान यांचा त्याग न करण्याच्या त्याच्या अद्वितीय गुणाने व लोकोत्तर शौर्याने त्याच्या असंख्य अवगुणांवर झाकण पडले' ही पाठाऱ्यांची दृष्टी. गडकऱ्यांनंतर लिहिल्या गेलेल्या साऱ्या मराठी नाटकांतूनही हाच भाव प्रकटलेला दिसेल. म्हणूनच गडकऱ्यांच्या या नाटकाचे विशेष मोल आहे. संभाजीबद्दल साऱ्या मराठी बखरींनी जो एकमुखाने व एकमताने निर्णय दिला होता, तो स्वीकारून संभाजीच्या व्यक्तिरेखेचे अंतरंग उकलण्याचा गडकऱ्यांनी या नाटकात एक मोठाच प्रयत्न केला आहे. या नाटकाचा गडकऱ्यांच्या हातचा जो आराखडा उपलब्ध आहे, त्यामध्ये गडकऱ्यांनी 'तत्त्वगर्भ नाटक (Principle play)' म्हणून या कृतीचा निर्देश केला आहे. आत्यंतिक कर्तव्यनिष्ठेच्या पोटी नैष्कर्म्याच्या अवस्थेप्रत पोचलेली 'राजा' ही एक सर्वश्रेष्ठ शक्ती होय. व्यक्ती म्हणून सामान्यांच्या वाटयाला येणाऱ्या सुखदुःखांपेक्षा तिची सुखदुःखे फार निराळी. ह्या शक्तीचे

सामर्थ्य न ओळखता व्यक्तिनिष्ठ सुखोपभोगाच्या आहारी ही शक्ती जेव्हा जाते तेव्हा तिची भीषण शोकांतिका अटळ असते, हे सांगण्यासाठी गडकऱ्यांनी या नाटकाचा शेवटचा अंक प्रथम लिहिला. व्यक्ती म्हणून आत्यंतिक विकारांच्या आधीन गेलेला संभाजी हा ' राजा ', त्याच्या सर्वोच्च पतनाच्या क्षणी क्षणभर खडबडून जागा होतो आणि त्याच्या अंतःकरणाला शिवाजीमहाराजांच्या मोठपणाचा अचानक साक्षात्कार होतो. जन्मभर मूढपणामुळे शिवाजीसारख्या लोकोत्तर विभूतिमत्त्वाचे मम त्याच्या अंतःकरणाला चुकूनही स्पर्शिले नव्हते ! संभाजीच्या अंतःकरणातील विवेकबुद्धी अशा एका त्याच्या दुर्गुणाच्या सीमांतप्रसंगी जागी होते की, त्यामुळेच त्याच्या मूढपणाची दाहकता शतपटीने अंतःकरणावर आघात करते. त्याच्या मूढपणाला नियतीने बहाल केलेले कठोर शासन हे केवळ त्याच्यापुरतेच मर्यादित रहात नाही. कारण हा मढपणा केवळ व्यक्तिविनाशक नसून राष्ट्रविनाशक होता. त्यामुळे ' लाखांचा-पोशिंदा ' म्हणून जगण्याचे भाग्य वाट्याला घेऊन आलेला संभाजी लाखांना विनाशाच्या टकमक टोकावर उभा करतो. त्याच्या कर्तव्यच्युतीने साबाजी-हिरोजी सारख्यांचो पुण्याई, येसूबाईसारख्यांचे शहाणपण, हे सारे, गडकऱ्यांच्याच शब्दात सांगायचे म्हणजे, ' रद्द ' होतात. नायकाच्या अंतरंगातील स्वतःबद्दलचे अज्ञान त्याच्या सान्निध्यात येणाऱ्या साऱ्यांनाच अंधारात लोटून देण्यास कारणीभूत होते. मानवी जीवनातील कर्तव्याअकर्तव्याचा शोध घेण्यासाठी गडकऱ्यांनी सारे नाटकच तत्त्वगर्भतेने भारून टाकले आहे. नाटकातील संभाजी-खेरीज इतर मुख्य व्यक्तींच्या मनातील संघर्षाच्या कितीतरी परी गडकऱ्यांनी उभ्या केल्या आहेत. या आंतरिक संघर्षाची आच मात्र फक्त संभाजीलाच काय ती नाही ! विशेष म्हणजे, अंतःकरण विदीर्ण करणाऱ्या ह्या संघर्षावर उदात्ततेने इतर पात्रे मात करतात. दुर्व्यसनी पती की शिरक्यांच्या घराण्याचा सूडबुद्धीचा डंख, यांतून आपल्या उज्ज्वल पातिव्रत्याने येसूबाई एकदम उजळून निघते, तर राजनिष्ठेपायी आपल्या मुलाबाळांचा निष्ठुरतेने वध करणाऱ्या साबाजी, हिरोजी या व्यक्ती क्षणार्धात त्याच दिव्य तेजाने न्हाऊन निघतात. अगदी रायाजीसारखा प्रेमवेडादेखील मराठ्यांच्या सम्राज्ञीला वाचविण्यासाठी आपल्या प्रियतमेचा, शिवांगीचा, बळी देतो आणि शिवांगीही स्वेच्छेने हा आत्मयज्ञ करण्यास सिद्ध होते. पण हा सारा आत्मतेजाने तळपणारा तारागण ज्याच्याभोवती फिरत होता तो संभाजी हा ' मूळ बिंदूच शुद्ध नसल्याने ' व्यर्थ बलिदानाचा वाटेकरी ठरला. अंतर्गत संघर्षाने विद्ध झालेली ' तुळशी ' ही व्यक्ती म्हणजे संभाजीच्या नाण्याचीच दुसरी बाजू. पती हयात असता स्त्रीधर्म विसरून ती संभीजीच्या प्रेमात पडते. तिच्या अनावर वासनेमुळे खवळलेल्या सागरात ती उडी मारते आणि पती म्हणून तिला वाचविण्याच्या कर्तव्यकर्मात विस्मृती झाल्याने तिच्या पतीची विटंबना होते. त्याच्या नामर्दपणापोटी निर्माण झालेल्या द्वेषबुद्धीमुळे शिक्षा म्हणून स्वतःच्या

पित्याकडूनच तो मारला जातो. त्याच्यासाठी उसन्या सूडबुद्धीने पेटलेल्या या नाटकाच्या नायिकेच्या, तुळशीच्या मनातला सूडभाव येसूबाईच्या निर्भर्त्सनेने वाढीला लागतो आणि संभाजीबद्दलचे उत्कट प्रेम आणि तीव्र द्वेष यांच्या द्वंद्वात ती सापडते. शेवटी द्वेषाचा विजय होतो !

या नाटकामध्ये गडकऱ्यांनी विनोदनिर्मितीसाठी म्हणून जे प्रसंग योजिले आहेत, त्यामुळे या लोकनाटयाचे रंग गडद होतात. रायाजीचा त्याच्या पदाला न शोभणारा पागलपणा, जिवाजीची बढाई आणि देहूच्या रांगड्या देहातील महत्त्वाकांक्षा हीदेखील मनामध्ये विषाद उत्पन्न करतात. अशा प्रकारचा डॉन क्विक्झोटी विनोद हा मूलतः शोकात्मच असतो, ह्या उनामुनो ह्या इटालियन समीक्षकाच्या म्हणण्याची प्रचिती येथे चांगल्या प्रकारे येते. मानवी जीवनातील शोकनाटयाचा इतक्या निरनिराळ्या थरांवर विचार करणारी ही मराठीतील एकदम निराळी कृती होय. तिचा आवाका फार मोठा आहे.

## सरस शोकनाटय

गडकऱ्यांच्या या कृतीवर शेरिडीनच्या 'पिझारो' या नाटकाची छाया आहे. १९१५ साली या इंग्रजी नाटकाचा मराठी अनुवाद नारायण केशव बेहरे यांनी प्रसिद्ध केला होता. ह्या नाटकामध्ये देशभक्ती किंवा राष्ट्रीयता ही सद्गुणाची प्रतीके असून त्यामुळे जीवनात यश येतेच असे नाही; नियतीच्या कठोर जात्यामध्य आंधळ्या देशभक्तीपायी खऱ्या राष्ट्रनिष्ठेने भारलेली मनेही भरडली जातात; ह्या तत्त्वाचे आविष्करण करण्यात आले आहे. प्रस्तावनेत नाटककार म्हणतो.

'Feelings of Right and Wrongs should always balance down all patriotic feelings in a man. Patriotism is no virtue at all; it is felt virtue as only when coupled with Justice on its side !'

नाटककाराचा हा विचार शोकनाटयाचा निदर्शक आहे. ह्या विचारांचे दिग्दर्शन जसे 'पिझारो' मधून झाले आहे, तसेच 'राजा म्हणजे जगाचा उपभोगशून्य स्वामी ! राज्य-उपभोग म्हणजे राजसंन्यास ! ना विष्णुः पृथिवीपतिः !' या तत्त्वाचे 'राज्यसंन्यास' मधून आविष्करण झाले आहे. 'पिझारो' वर आत्यंतिक प्रेम करणारी एलव्हिरा ही, प्रेम करते त्याच्या पराक्रमावर आणि द्वेष करते ती त्याच्या आंधळ्या राष्ट्रभक्तीपायी त्याने धारण केलेल्या अमानुषतेवर. आणि शेवटी तीच त्याच्या नाशास कारण होते. या एलव्हिरामध्ये आणि तुळशीमध्ये साम्य आहे. संभाजीला अटकेत टाकल्यानंतर साबाजी त्याला भेटावयास जातो. हा प्रसंग या नाटकातील पराक्रमी वीर अँलेंझो अटकेत असता त्याचा मित्र रोला त्याला भेटावयास जातो, त्या धर्तीवर आहे. पण ही सारी केवळ वरवरची साम्ये आहेत. 'पिझारो' हे एक सामान्य नाटक आहे. गडकऱ्यांच्या 'राजसंन्यास' ची झेप फार मोठी आहे. त्याची सारी बैठकच मराठ्यांच्या इतिहासाच्या नेमक्या

वैशिष्ट्याला हात घालणारी आहे. ' महाराष्ट्रधर्मा ' चे तत्त्व तिच्यामधून अविष्कृत झाले आहे. तिच्यामध्ये शोकनाट्याने भरलेल्या मराठ्यांच्या इतिहासातील एका दुर्दैवी कालखंडाचे, आणि पौरुष व पराक्रम यांचा संगम झालेल्या संभाजीसारख्या व्यक्तिमत्त्वातील आत्मविस्मृतीची जाणीव किती दारुण असते याचे, प्रत्यंतर आढळते. ' राजसंन्यास ' चे मधले काही अंक आणि प्रवेश लिहायचे राहिले आहेत. त्यामुळेच उजाड माळावर क्षितिजाला भिडलेल्या एखाद्या भव्य परंतु अपुऱ्या शिल्पाप्रमाणे ते भासते. तिच्यातील भव्यता ही अभिजाततेची (Classical) व महाकाव्याच्या जातीची (Epic Grandure) आहे. तिच्यामध्ये परके वाटावे असे वातावरण किंवा कल्पना यांचा अंशही नाही. सारे खास मऱ्हाटी आहे.

' राजसंन्यास ' हे नाटक भावरम्य किंवा रम्याद्भुत दारुण नाट्याच्या जातीचे (Romantic Tregedy) आहे. आत्यंतिक निष्ठा, आत्यंतिक प्रेम, आत्यंतिक द्वेष यांच्या उठावामुळे सारे नाटकच भावरम्यतेने भरून गेलेले आहे. परंतु ही भावरम्यता कृत्रिम,, बगडी किंवा काल्पनिक व्यक्तित्वाचा उठाव करणारी नसून, तिच्या साहाय्याने इतिहासकाळातील माणसे, त्यांची जीवनमूल्ये आणि त्यांच्या दुबळेपणातून व्यक्त होणारे त्यांचे माणूसपण (Humanness) यांचा शोध घेण्याची धडपड गडकरी करीत असताना दिसतात. हे सारे करण्यामध्ये गडकऱ्यांच्या भाषा-शैलीचे कार्यही मोठे असते, गडकऱ्यांच्या भाषेमध्ये केवळ कल्पनाशक्तीचा फुलोरा नसतो. ह्या कल्पनाशक्तीच्या तीव्र आवेगामध्ये भावगर्भता आणि तत्त्वगर्भता लपलेली असते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिचित्रणांमध्ये ठोकळेबाजपणा येत नाही. गडकऱ्यांच्या भाषेतील कल्पनाविलासाची झेप दिपवून टाकते, परंतु केवळ दिपवून टाकणे एवढेच तिचे कार्य नसते. ती त्याचबरोबर मनाला भिडण्याचे व क्षणोक्षणी आपल्या विचारशक्तीला सतत खिजविण्याचे, शिणविण्याचे कार्य करीत असते. विचारशक्तीला खिजविण्याचे आणि शिणविण्याचे सामर्थ्य असलेली नाटके मराठीत किती आहेत, याचा एक क्षणभर विचार केला तर मग गडकऱ्यांचे सामर्थ्य लक्षात यावयास वेळ लागत नाही.

गडकऱ्यांची भाषा ही केवळ आवेशपूर्णतेने भरलेली, ऐतिहासिक वातावरण-निर्मितीसाठी उद्भविलेली राणा भीमदेवी थाटाची असल्याने ती अत्यंत कृत्रिम असते, असा एक आरोप नेहमी करण्यात येतो. या आरोपाचा फोलपणा, १९१२ साली रंगभूमीवर आलेल्या व अतिशय लोकप्रिय ठरलेल्या ' राक्षसी महत्त्वाकांक्षा ' या नाटकाच्या शेजारी ' राजसंन्यास ' ठेवून पाहिल्यानंतर ताबडतोब येतो. ' राक्षसी महत्त्वाकांक्षा ' या नाटकामध्ये राणी मदालसा ही अमानुष वृत्तीची, तिचा क्रूरपणा हा राक्षसालाही लाजवील असा. तिच्या कच्छपी असलेली कोदंड व दुर्जय ही पात्रे राणीपायी विकत घेतलेल्या या क्रूरपणाची प्रतीके, तर राणीला पदच्युत करून खऱ्या राजवंशाची प्रतिष्ठापना करण्यासाठी आत्यंतिक अमानुष छळाच्या दिव्यातून

जाऊनही अभंग राहणारी विक्रांत, सरोजिनीसारखी पात्रे ही सुष्टतेची प्रतीके. उजळ पांढरा आणि भडक काळा या रंगांखेरीज या व्यक्तिचित्रणांमध्ये दुसरा रंग नाही. आवेशपूर्णतेने व्याख्याने देताना इंग्रजांच्या राज्यनीतीचे अत्यंत भयावह व भडक चित्र उभे करणारे व्याख्याते वीर वामनराव, त्यांची व्याख्यानाची भाषा व 'राक्षसी महत्त्वाकांक्षा'ची भाषा यात काडीचाही फरक नाही. आत्यंतिक सुष्ट-दुष्ट पात्रे आणि त्यांच्या आत्यंतिक निष्ठा व्यक्त करताना या नाटकातील एकाही व्यक्तिचित्रणाला वामनराव मानवीपण बहाल करीत नाही. ते केवळ काल्पनिक अद्भुतरम्यतेच्या युगास साजेसे भडक रंगांनी विणलेले चित्र रेखाटतात. त्यामध्ये मानवी जीवनातील खऱ्याखुऱ्या सामर्थ्याचा व दुबळेपणाचा कसलाही प्रत्यय येत नाही. मानवी दुःख, मानवी दुबळेपणा, मानवाचे सामर्थ्य आणि त्याच्या आत्मविश्वासातून अहंकाराच्या पातळीवर जाणारी, त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा एक अविभाज्य भाग बनून गेलेली विकृती ही सारी जीवननाटयाची अंगे प्रकटविण्याचे गडकऱ्यांच्या भाषेचे सामर्थ्य नाकारता येत नाही. त्याचे बाह्यरूप कृत्रिम, नाटय-विघातक वाटावे असे दिसते. परंतु त्याचे अंतःसामर्थ्य नितांत जीवनस्पर्शी व नाटयानुकूल असते. हा एक चमत्कारच आहे. त्यामुळे गडकऱ्यांच्या भाषेचे दुबळे व वरवरचे अनुकरण होऊ शकते. परंतु या भाषेद्वारा गडकरी ज्या अंतर्द्वंद्वाचा ठाव घेतात, ती शक्ती गडकऱ्यांखेरीज अन्यत्र आढळत नाही. आपल्या कल्पना-शक्तीने उत्कट प्रसंगांशी होड लावून आणि आपल्या भाषाप्रभुत्वाचे सारे वैभव पणास लावून 'संभाजी' ह्या इतिहासातील अत्यंत नाटयमय जीवनाचा अर्थ उलगडावयाचा या ईर्षेने हे नाटक त्यांनी लिहावयास घेतले. त्यामुळे ह्या नाटकाची


# अग्निपुत्र

वसंत पोतदार

मूल्य : रुपये चौदा

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

भाषा त्यांच्या इतर नाटकांपेक्षा निराळी आहे. गद्यातील लयबद्धतेची शोभा किती प्रकाराने गडकऱ्यांनी या नाटकात उभी केली आहे.

## अपुरे राजसंन्यास

गडकऱ्यांच्या संकल्पित नाटकांमध्ये महाराष्ट्रलक्ष्मी, तुळशीदास, वीरवंदन, सुरती शिक्का व शिवराई शिक्का, ब्रह्मकौस्तुभ, इ. ऐतिहासिक स्वरूपाच्या नाटकांचा उल्लेख आढळतो. परंतु जवळजवळ ८० पृष्ठांचा मजकूर लिहिलेले पहिल्या अंकाचे महत्त्वाचे प्रवेश व शेवटचा संपूर्ण अंक व मधले काही त्रुटित प्रवेश असलेले 'राज्यसंन्यास' हे नाटक गडकऱ्यांनी पुरे का केले नाही या संबंधाने अनेक प्रकारचे विचार व्यक्त करण्यात आले आहेत. "या नाटकात आपल्या लेखनकौशल्याची कमाल करायची, असे गडकऱ्यांनी ठरविले असल्यामुळे ते कसे तरी हातावेगळे करणे त्यांना शक्य नव्हते. चंद्राप्रमाणे स्फूर्तीचेही पूर्णत्व विरळ असते, पूर्ण स्फूर्तीवाचून राज्यसंन्यासाचे लेखन करावयाचे नाही, या गडकऱ्यांच्या निश्चयामुळे हे नाटक १९१६ त आरंभिले असूनही १९१९ पर्यंत अपुरेच राहिले," अशी या बाबतीतली खांडेकरांची मीमांसा असून ती गडकऱ्यांच्या निकटवर्तीयांच्या आठवणींवर आधारित आहे. गडकऱ्यांच्या भावजीवनावर आघात करणाऱ्या काही नाजूक घटनांमुळे अत्यंत संवेदनशील, आत्मनिष्ठ वृत्तीच्या या लेखकाची मनःस्थिती हे भव्य शिल्प पुरे करण्याच्या अवस्थेत राहिली नसावी असे 'गडकऱ्यांचे अंतरंग' ह्या पुस्तकात डॉ. वाळिंबे यांनी सुचविले आहे.

हे नाटक अपुऱ्या अवस्थेत गडकऱ्यांनी सोडून दिले त्याचे कारण तत्कालीन राजकीय अस्थिर परिस्थितीतही सापडू शकेल. ह्या नाटकास राजकीय बंदिवास सोसावा लागेल अशी भीती गडकऱ्यांना तत्कालीन परिस्थितीमुळे वाटली असावी, असे मानण्यास सबळ पुरावा आहे. १९१२ च्या सुमारास संभाजी या पाठाऱ्यांच्या नाटकावर बदी घालण्यात आली तो त्यातील संभाजी व औरंगजेबाची कन्या रोषन आरा यांच्या प्रणयप्रसंगचित्रामुळे. मुसलमानांनी ऐतिहासिक आधार नसलेल्या प्रणयचित्रामुळे आपल्या भावना दुखविल्या जातात, अशी तक्रार केल्यामुळे सरकारने २-१०-१९१२ साली ह्या नाटकावर बंदी घातली. संभाजी रोषन आराला रखेली म्हणून ठेवू इच्छितो व रखेली म्हणून राहण्यास केवळ ती नकार देते, ही कल्पना आक्षेपार्ह होती. सरकारने या कल्पनेला काहीही ऐतिहासिक आधार नाही, याची खात्री करून घेतल्याचे बंदीहुकुमात म्हटले आहे. बंदी घालणाऱ्या अधिकाऱ्याने शेवटी लिहिले आहे—

'I have gone through the play and I do not think Marathi literature will loose much on the stage either by this play being prohibited.'

गडकऱ्यांनी, पाठाऱ्यांनी कल्पिलेली तुळसा जशी घेतलेली आहे, तसेच त्यांच्या

मनात रोषनआरा-संभाजी यांच्यातील प्रणयप्रसंगही चित्रित करावयाचे होते असे दिसते. पांचव्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशात सावाजीला बंदिवान संभाजीस भेटण्याची मुभा मिळते ती रोषन आराने बादशाही सहीशिक्क्यानिशी दिलेल्या परवान्यामुळे, असे गडकऱ्यांनी वर्णिले आहे. तिसऱ्या-चोथ्या अंकात संभाजी-रोषनआरा याचे संबंध प्रस्थापित केल्याखेरीज पाचव्या अंकात एकाएकी अशा आणीबाणीच्या प्रसंगी तिची सहानुभूती संभाजीकडे आहे हे दाखविणे कसे शक्य आहे ? हे मधले अंकच लिहावयाचे राहून गेले आहेत. १९३० साली दत्तात्रय सदाशिव सुळे यांनी ' संगीत राजसंन्यास नाटकाची पुरवणी ' लिहून हे नाटक पुरे करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे. त्यामध्य संभाजी-रोषन आरा यांचे प्रवेश त्यांनी लिहिले आहेत आणि त्यामध्ये ' एक पानही स्वतःच्या बुद्धीने न लिहिल्याची ' ग्वाही दिली आहे.

गडकऱ्यांचे राजसंन्यास १९२२ मध्ये रंगभूमीवर आले आणि अपूर्ण स्वरूपात नाटकही प्रसिद्ध झाले. त्याचा परिणाम यानंतरच्या ऐतिहासिक नाट्यवाङ्मयावर झाल्याखेरीज राहिला नाही. गुप्त्यांची १९२२ पूर्वीची व नंतरची नाटके पाहिली, की हा फरक लक्षात येतो. वि. ह. औंधकर यांची ' बेबंदशाही ' व ' आग्ऱ्याहून सुटका ' ही नाटके गडकऱ्यांच्या परंपरेचे अनुकरण करणारी आहेत. औंधकरांनी ऐतिहासिक नाट्यलेखनासाठी आवेशपूर्ण अशी भाषा परिश्रमाने कमाविलेली व उपलब्ध ऐतिहासिक कागदपत्रांची कदर केलेली दिसते. तत्कालीन संगीतप्रधान नाटकांच्या आहारी न जाता आणि टिपणीसप्रणित ऐतिहासिक नाटकांचा साचा डावलून इतिहासातील संघर्षांचे प्रसंग, ऐतिहासिक व्यक्तींचे स्वभाव, इतिहासकाळात प्रेक्षकांना नेऊन सोडणारी दमदार भाषेची फेक आणि माफक विनोद यांच्या साहाय्याने ह्या दोन्ही परिणामकारक कृती निर्मिलेल्या आहेत. महाराष्ट्र नाटकमंडळीच्या नटांचे जे नाटककार झाले त्यामध्ये औंधकरांच्या या दोन नाटकांनी यशाचा मोठाच पल्ला गाठला.

[ **उत्तरार्ध पुढील अंकी** ]

**भीमराव कुलकर्णी यांनी लिहिलेल्या ' मराठी ऐतिहासिक नाटके ' या प्रबंधातील ' संभाजी 'वरील नाटकांचे एक चिकित्सक विवेचन.**



# अटलांटिस चे बावीस बळी....



निरनिराळे नाटयपूर्ण देखावे करत दुसऱ्या महायुद्धात जर्मन नौका 'अटलांटिस'ने धडाकन खळबळ माजवली.

**जिप्सी मधुकांत**

क्षितिजावर लहरत्या लाटांतून दृश्यमान होणारे ते अनोळखी जहाज पाहून 'सिटी ऑफ एक्स्टीअर'च्या कप्तानाला गूढ वाटले. १९४० चा मे महिना. नाझी जर्मनीची आगेकूच चालू होती. केव्हा कुठले जहाज बत्ती देऊन जाईल याची खात्री नव्हती. 'एक्स्टीअर'ने बारकाईने निरीक्षण केले. डेकवर किमानो घातलेल्या स्त्रिया होत्या. जपानी खलाशांच्या बुटक्या आकृती आणि त्यांचे कपडे ओळखू येत होते. त्या नवख्या जहाजाचा अंदाज अर्ध्या एक तासानंतर 'एक्स्टीअर'च्या कप्तानाला आला. ते आठ हजार चारशे टनी 'काशीमारू' हे जपानी जहाज होते ! म्हणजेच तटस्थ. त्यावेळी तरी. दोन्ही जहाजे बेरोक परस्परांना ओलांडून गेली. थांबली नाहीत किंवा सिग्नल द्यायची सुद्धा गरज नव्हती.

पण दक्षिण अटलांटिकच्या लाटांवर उसळणाऱ्या त्या 'काशी मारू'वरच्या खलाशांची नावं फ्रित्स, क्लाऊस, कार्ल अशी होती ! आणि त्या किमोनोधारी

स्त्रिया नव्हत्या ! ३५० तंत्रज्ञ आणि सशस्त्र नौदल आतल्या डेकखाली होते. रंगांच्या लहरींनी आणि चित्रांनी झटपट मुखवटे बदलणारी ती जर्मन युद्धनौका 'अटलांटिस' होती ! साता समुद्रावर अघाशीपणे भक्ष्य हुडकणारी आणि इतर नौकांना जरब बसवणारी 'अटलांटिस'! चाचेगिरी आणि बेलगाम चढाई करणारी.

दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीला जर्मनांनी अशा सात धाडी घालणाऱ्या नौका समुद्रावर सोडल्या होत्या. त्या सर्वांनी मिळून दोस्तांच्या १३६ नौकांचा घास घेतला. त्यापैकी 'अटलांटिस'ला सर्वांत जास्त संधी मिळाली. तिच्या कर्तृत्वाचा दराराही चांगला गाजला.

जर्मन हंसालाईनमध्ये सात हजार आठशे टनी मालवाहू नौका म्हणून 'गोल्डेनफेल्स' या मूळ नावाने तिचे सुरुवातीला पदार्पण झाले. युद्धाचे ढग पसरू लागले तेव्हा तिचा कायापालट झाला ! सहा इंची गुप्त तोफा तिच्यावर चढवण्यात आल्या. तसेच छोट्या तोफा, टार्पेडो ट्यूब, विमानाची धावपट्टी आणि तंत्रज्ञ सैनिकांचा तांडा. जोडीला डझनभर निष्पाप दिसणारे व्यापारी आणि खाणमालाचे भरवणसुद्धा. शिवाय रंगभूषेचे चिक्कार सामान !

थोराड बांध्याच्या, चाळीशीतल्या रुबाबदार अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली १९४० च्या मार्चमध्ये नार्वेच्या किनाऱ्यावरून नजर चुकवून 'अटलांटिस'ने मोहिमेला सुरुवात केली. त्या रुबाबदार कॅप्टनचे नाव बर्नहार्ड रोग. उत्तर अटलांटिकमध्ये तिने मुक्तपणे संचार सुरू केला तेव्हा एका रशियन गलबताची वतावणी केली. केप ऑफ गुड होपच्या परिसरातल्या सापडेल त्या एकट्या दुकट्या जहाजावर अचानक हल्ला चढविण्याची कामगिरी 'अटलांटिस'ला मिळाली होती.

२५ मे रोजी विषुववृत्त ओलांडल्यावर अटलांटिसने आपला रशियन ध्वज खाली उतरवला. डेकवर किमोनो आणि जपानी गणवेष लहरू लागले. हीच ती सिटी ऑफ एक्टीअरला ओलांडून गेलेली 'काशी मारू' उर्फ अटलांटिस ! त्यावेळी एक्स्टीअरवर हल्ला चढवण्याचा मोह रोगने टाळला कारण अटलांटिसवर पॅसेंजर्सही खूप होते.

## तीन क्यूज

अटलांटिसने पहिला घास घेतला तो ब्रिटिश नौका 'सायंटिस्ट'चा. बिनतारी संदेश बंद करा आणि नांगर टाका असा आदेश समोरच्या नौकेवरून आलेला पाहून 'सायंटिस्ट' चकित झाली. पण ऑपरेटरच्या मनात 'QQQ' असा गुप्त पण निरर्थक कंपनांचा संदेश द्यायचा विचार सुचला. ती कंपने घोंगावली. त्याचा अर्थ 'शत्रूचे सशस्त्र व्यापारी जहाज रोकण्याचा आदेश देत आहे' असा होता. अटलांटिसने संतापून तोफांचा भडिमार केला. बिनतारी मनोरा उद्ध्वस्त केला. भगदाड पडले. सायंटिस्टवरच्या ७७ सैनिक अधिकाऱ्यांनी छोट्या बोटींचा आश्रय घेतला. त्यातले दोघे गंभीर जखमी होते. त्या सर्वांना अटक करून अटलांटिसवर

घेण्यात आले आणि सायंटिस्टला टार्पेडो डागून जलसमाधी देण्यात आली.

दोन आठवड्यानंतर केपला वळसा घेताना कॅप्टन रोगला एका ब्रिटिश चेतावणीच्या संदेशाचा सुगावा लागला. एक जर्मन युद्धनौका जपानी बोट असल्याची बतावणी करीत हिंदी महासागरात शिरत असल्याचा धोका आहे. ताबडतोब अटलांटिसने किमोनो उतरवले ! आणि नेदरलंडची 'अॅबेकर्क' म्हणून नवे रूप धारण केले.

पॅलेस्टाईनमधील ऑस्ट्रेलियन सैनिकांना रसद पुरवठा करणाऱ्या 'तिरॅना' या नौकेवर नंतर अटलांटिसने दुसरी झडप घातली. ती बोटच गिरफ्तार करून तिला काही आठवडे तुरुंगनौका म्हणून फरफटवले.

महिन्याभरानंतर लागोपाठ तीन नौकांचे बळी अटलांटिसने घेतले. त्यापुढल्या महिन्यात आणखी पाच नौका रसातळाला पोचवल्या !

## अटलांटिसवरचे वातावरण

थरकणाऱ्या लाटांत ब्रिटिश नौकांना अटलांटिसचीच चाहूल जाणवत होती ! कचऱ्याच्या टोपलीत फेकलेल्या कागदातून जर्मन गुप्त हेरांनी ब्रिटिश नौदलाच्या सांकेतिक संदेशांची फोड-कला अवगत केली होती. त्याआधारे ब्रिटिश व्यापारी जहाजांचे संदेश रोगला उलगडता येऊ लागले. पण ब्रिटिश नौदलाने हुकूम सोडला होता, की अनोळखी जहाजांची चाहूल लागताच बिनतारी संदेशांचा सरळ वापर करून त्वरित संपर्क साधा. त्यामुळे आमनेसामने येण्याआधीच अटलांटिसने नवे तंत्र अंगीकारले, परके जहाज दिसताक्षणीच आधी बत्ती द्या, मग जाबजबाब करू !

अटलांटिसने बळी घेतलेल्या निम्म्याहून अधिक जहाजांनी-नौकांनी बुडण्याआधी संदेश पाठवण्याची तारांबळ केली होती. त्यांपैकी बहुतेकांवर तुफान भडिमार करण्यात आला. काहीवेळा तर प्राणहानीही भयंकर झाली. पण कॅप्टन रोगने या सागरी चाचेगिरीच्या तुफानातही सहिष्णुता ठेवली. जास्तीत जास्त प्राण वचावण्याची त्याने शिकस्त केली. त्यांना अटक करून बोटीवर तुरुंगात ठेवले. वीस महिन्यांच्या त्याच्या या मोहिमेत त्याने जवळपास दहा हजारावर कैद्यांना सहारा दिला होता. त्यात लहानमोठ्या वयाचे, अनेक राष्ट्रांचे स्त्री-पुरुष होते, त्यांच्या कंपनी इतकेच रेशन तो कैद्यांना देई. 'शांतते'च्या काळात तो त्यांना डेकवर हिंडायची सवलत देई. तसेच अटकेतल्या कॅप्टन्सचीही स्वतंत्रपणे त्याने बडदास्त ठेवली होती. नार्वेजियन व ब्रिटिश कॅप्टन्सनी आपला क्लब स्थापला होता. जर्मनही त्यात सहभागी होत. रंगेल चर्चा चालत. फक्त 'राजकारण' पूर्ण वर्ज्य होते ! अन्य जर्मन जहाजातून जेव्हा हे कैदी पाठवले जात तेव्हा कॅप्टन रोग त्यांना निरोपाच्या मेजवान्या देई.

१९४० च्या हिवाळ्यात मात्र अटलांटिसची उपासमार ओढवली ! चाळीस दिवसांत केवळ एकाच नौकेचा प्रसाद मिळाला ! त्यानंतर मात्र नोव्हेंबरच्या

मध्यात याची सारी कसर निघाली. अठ्ठेचाळीस तासांत तीन नौकांचा समाचार घेतला ! 'ओल् जॅकब' हे नार्वेचे तेलवाहू जहाज तर कसलाही प्रतीकार न होता काबीज करण्यात आले. अटलांटिसने एक लाँच सोडली, त्यात ब्रिटिश गणवेष घातलेले कॅप्टन रोगचे अधिकारी होते ! 'ओल् जॅकब' फसले. 'टेडी' हे दुसरे नार्वेजियन टँकर तर तोफखान्याने धुमसले. त्याच्या ज्वाला त्या परिसरातल्या सर्व बोटींनी पाहिल्या. 'ऑटोमेडन' या ब्रिटिश नौकेवर गोळे पडले तेव्हा ब्रिजवरचे सारे खलाशी ठार झाले. पूर्वेकडे गुप्त कागदपत्रे वाहून नेणाऱ्या या नौकेने अखेर शरणागती पत्करली.

अटलांटिसवरच्या व्यवस्थेत कॅप्टन रोगने मोठी शान आणली होती. हाताखालच्या लोकांना एकदिलाने वागवण्यात, संघटित करण्यात त्याच्या अंगी अभिजात कौशल्य होते. बिअर, मिठाई, खाद्यपेयांची पार्सले यातला हिस्सा तो सर्वांना देई. किनाऱ्यावरच्या रजेऐवजी तो बोटीवरच आठवड्याभराची सुट्टी सैनिकांना देत असे. अर्थात आणीबाणीच्या काळात रजा वगैरे ताबडतोब संपुष्टात येत. त्या दगदगीच्या तुफानात अधूनमधून या सुट्ट्या सैनिकांना खूप 'रिलॅक्स' वाटत.

१९४१ साल सुरू झाले आणि अटलांटिसचे दैव फिरले. अनेक महिन्यांतून केवळ चारच बोटी गवसल्या. त्यातली एक इजिप्शियन 'झाम झाम' होती. त्यावर १५० अमेरिकन मिशनरी, आणि इतर पॅसेंजर्स व तंत्रज्ञ मिळून ३०९ होते. दुसऱ्या दिवशी 'ड्रिक्डेन' या जर्मन बोटीने येऊन त्या सर्वांना बार्देक्सच्या किनाऱ्यावर नेले.

अटलांटिसच्या दराऱ्याने व्यापारी जहाजे लांबचा पल्ला घेऊ लागली. वेळ आणि इंधन वाया जाऊ लागले. आणि अटलांटिसच्या 'डेंजर झोन'मधून जाताना खलाशांना भारी भत्ता द्यावा लागत असे ! एकूण या दराऱ्याने इतरत्र कामगिरीत असलेल्या ब्रिटिश विनाशिकांना ती कामगिरी सोडून इकडे वळावे लागत होते.

१९४१ च्या उन्हाळ्यात हिंदी महासागरात लाटा तुडवीत अटलांटिस नुसतीच भरकटत होती. केवळ काही समुद्रपक्षीच लाभले ! १० सप्टेंबर १९४१ मध्ये अटलांटिसने आपला २२ वा प्रसाद घेतला ! नार्वेजियन नौका–'सिल्वाप्लाना'– आणि हा अटलांटिसने घेतलेला अखेरचा बळी ठरला...

## डेव्होनशायरचे आगमन !

२१ नोव्हेंबरला सकाळी अटलांटिसच्या धावपट्टीवर उतरताना तिच्या स्काऊट विमानाची मोडतोड झाली.

दुसऱ्या दिवशी यू १२६ ही पाणबुडी अटलांटिससाठी तेलाचा पुरवठा करणार होती. आणि या नाजूक कामगिरीत असताना अटलांटिस अरक्षित अवस्थेत रहाणार होती. कारण विमानाचे साहाय्य नव्हते. ठरल्याप्रमाणे ब्राझिल आणि आफ्रिका यांच्या मध्यमार्गावर एका गुप्त संकेतस्थानी या दोन बोटींची भेट झाली. सकाळी

नास्त्याच्या वेळी यू १२६ ने तेलाचे पंप चालू केले. तिचा कॅप्टन अटलांटिस वर आला होता. जवळच्या मोटार लाँचमध्ये कॅप्टन रोगचे अधिकारी होते. त्याच वेळी अटलांटिसच्या पोर्ट इंजिनचीही दुरुस्ती करायची होती.

अचानक अटलांटिसवरच्या टेहळणी मनोऱ्यावरच्या निरीक्षकाला सूर्यकिरणांनी लाटावलेल्या क्षितिजावर एक बिंदू दिसला ! ब्रिटिश विनाशिका ' डेव्होनशायर ' कॅप्टन ऑलिव्हरच्या नेतृत्वाखाली त्यांच्याच रोखाने वेध घेत यत होती !

तो सुगावा लागताक्षणी यू बोटीने–पाणबुडीने–तळाशी बुडी घेतली. तिचा कॅप्टन अटलांटिसवरच अडकला होता ! आणि गडबडीत डिस्कनेक्ट केलेल्या तेलाच्या पाइपांनी निर्माण झालेले प्रचंड तवंग लाटांवर लहरत जाऊ लागले.

अटलांटिसला एकच आशा होती. दिमाख दाखवून बडबड करीत, नाटक करीत आणखी वेळ पसार करण्याची. तेवढ्या वेळात ' डेव्होनशायर ' पाणबुडीच्या टार्पेडोच्या माऱ्यात सापडली तर ठीकच...

' डेव्होनशायर 'च्या कॅप्टन ऑलिव्हरला मात्र खात्री पटत नव्हती. तेलाचे ओघळ सोडणाऱ्या या नौकेचे व्हेंटिलेटर्स सोडले तर शांत सागरावरची ही ' अटलांटिस ' असावी, असा कयास होता. त्याने धुराचे भपकारे सोडून मागेपुढे चाल नक्की टार्पेडोच्या माऱ्यापासून सुरक्षित अंतरावर राहून त्याने अटलांटिसवर दोन गोळे डागले.

## यू १२६ च्या कॅप्टनला नियतीने चकवले

हा मोठा अटीतटीचा क्षण होता. प्रत्युत्तर द्यायला हवे होते. कॅप्टन रोगने संदेश धाडला, की ही ' पॉलिफेमस ' नौका आहे ! कॅ. ऑलिव्हरने दक्षिण अटलांटिकच्या कमांडर इन चीफशी संधान जोडले आणि ही अनोळखी नौका खरोखरीची ' पॉलिफेमस ' आहे काय, याची चौकशी करण्यासाठी प्रश्नांचा भडिमार केला.

जवळपास एक तासभर अटलांटिस त्या विस्तीर्ण जलाशयावर हेलकावे खात डुचमळत होती. यू १२६ या पाणबुडीबद्दल कॅ. रोगला खूपच आशा होती. पण तिचा सीनियर ऑफिसर पाणबुडी घेऊन जवळपासच होता आणि कॅप्टन तर अटलांटिसवर चडफडत होता !

९–३४ वाजता दक्षिण अटलांटिक कमांडकडून कॅ. ऑलिव्हरला संदेश मिळाला– ' नो–रिपीट–नो ! ' आणि एका मिनिटानंतर ' डेव्होनशायर 'ने पुन्हा तोफा डागल्या ! तिसऱ्या आठ इंची गोळ्यांचा भडिमार अटलांटिसवर तडकला तेव्हा कॅ. रोगने शेवटच्या आज्ञा दिल्या. नौकेवरून सोडून जाण्याचा आदेश दिला. जाताना नौकेत सुरुंग पेरले आणि दहा वाजण्यापूर्वीच काळ्याकुट्ट धुराच्या लोटात अटलांटिस दुभंगून बुडू लागली...छोट्या तराफ्यावरून तरंगणाऱ्या कॅ. रोगने अखेरचा सॅल्यूट ठोकला.

पण ' डेव्होनशायर 'ने त्वरितच पळ काढला ! पाणबुडीच्या टार्पेडोचा धोका

तिला पत्करायचा नव्हता. त्यामुळे 'डव्होनशायर' दिसेनाशी झाल्यावर अटलांटिस-वरच्या सैनिकांना शिट्या वाजवून, खुणवून एकत्र करण्यात आले! तोफमाऱ्यात केवळ सातजणांचाच बळी पडला होता. बाकी सुरक्षित होते. जवळजवळ शंभरजण अवशेषांना पकडून तरंगत होते. पाणबुडीवर जखमींना घेण्यात आले. सहा लाईफ-बोटीत दोनशेंची भरती झाली. बावन्नजणांना लाईफबेल्ट देण्यात आले. जवळचा किनारा ब्राझिलचा ९५० मैल दूर होता!

## पुन्हा संकटात

पाणबुडीच्या मागे दुपारनंतर हा सगळा विलक्षण तरता कबिला निघाला. दिवसातून दोन वेळा खरी तराफ्यातून त्यांना जेवण पुरवले जात होते. तीन दिवसांनंतर यू १२६ या पाणबुडीची गाठ जर्मन 'पायथॉन' या पुरवठा पाणबुडीशी पडली. 'पायथॉन'वर सर्वांना सहारा मिळाला. पण त्यांच्या नशिबी पुन्हा सागर-लाटाच होत्या! 'डॉर्सेटशायर' या विख्यात विनाशिकेने 'पायथॉन'ला मध्येच गाठून जलसमाधी दिली! 'बिस्मार्क'ला दणका देणारी हीच ती 'डॉर्सेट्शायर!' काही महिन्यांपूर्वीच जर्मनीच्या अजिक्य प्रिन्स बिस्मार्कला जलसमाधी देण्यात आली होती.

जर्मन आणि इटालियन पाणबुड्यांचा आसरा घेत अटलांटिसवरचे सैनिक १९४२ च्या नववर्षदिनी बर्लिनला जाऊन पोचले.

कॅ. रोगला रिअर अॅडमिरल म्हणून बढती मिळाली. पण नंतर त्याच्या 'नाझी-विरोधी' प्रवृत्तीचा सुगावा लागला म्हणून त्याला कमी महत्त्वाची जागा देण्यात आली! युद्ध संपल्यानंतरसुद्धा कॅ. रोगला अनेक मित्रांकडून पत्रे येत. त्याने बुडव-लेल्या जहाजांपैकी ज्यांच्या कप्तानांना वाचवले, बंदिवासात चांगले वागवले ते रोगला भेटी, मिठाईची पार्सले पाठवत. किंग सिटी, केमेन्डाईन, सिटी ऑफ बगदादसारख्या नामांकित नौकांना 'अटलांटिस'ने सागरतळ दाखवला. पण कॅ. रोगची व्यक्तिगत सहिष्णुता जागी होती.



 पृष्ठ ११ वरून

मंडळाच्या (दत्त समितीच्या) अहवालात दिलेली आहे. त्या यादीमध्ये मोटारचे सुटे भाग, सायकली, डिझेल इंजिने, ट्रँझिस्टर, सौंदर्य प्रसाधने, साबण, लोखंडी फर्निचर अशा ७३ वस्तू आहेत. शिवाय एकाच वस्तूच्या उत्पादनासाठी एकाहून अधिक परकीय कंपन्यांशी करारनामे केल्यामुळे एकाच तंत्रासाठी आपण रॉयल्टीज, फीज, सुट्या भागांची खरेदी इत्यादी स्वरूपात नाहक अधिक किंमत देत आहोत हे लक्षात ठेवले पाहिजे. उदाहरणार्थ, भूसुधारणेच्या अवजड यंत्रसामग्रीच्या उत्पादनाकरता भारत सरकारने एका परकीय कंपनीशी करारनामा केलेला असताना हिंदुस्थान मोटर्स ह्या बिर्लांच्या कंपनीस त्याच उत्पादनासाठी परकीय सहयोगाचा परवाना देण्यात आला आणि नेहमीपेक्षा अधिक रॉयल्टीची (६·२५ %)परवानगी देण्यात आली. १९५६ ते १९६५ ह्या काळात एकाच वस्तूच्या उत्पादनासाठी अनेक कंपन्यांना परवाने दिल्याची बरीच उदाहरणे सापडतात. साठ वस्तूंच्या बाबतीत प्रत्येकी ६ ते १० सहयोगांना, १४ वस्तूंच्या बाबतीत ११ ते १५ सहयोगांना आणि सात वस्तूंच्या उत्पादनासाठी प्रत्येकी १६ पेक्षा अधिक सहयोगांना परवानगी दिल्याची माहिती समितीच्या अहवालात दिलेली आहे.

## आक्षेपार्ह उधळपट्टी

परकीय सहकार्याने उद्योगधंद्याची उभारणी करण्यात विशेष डोळ्यावर येण्यासारखी उधळपट्टी केली ती बहुसंख्य लोकांच्या जीवनासाठी अनावश्यक अशा उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनासाठी परवानगी देऊन. एअर कंडिशनर्स, रेकॉर्ड, प्रेशर कुकर्स, खेळणी, टूथपेस्ट, बियर, जिन ह्यासारख्या भारतीय गरीब अर्थव्यवस्थेशी विसंगत असलेल्या वस्तूंच्या उत्पादनक्षेत्रामध्ये जवळजवळ २०० परकीय सहयोगांना मंजुरी दिल्याची माहिती दत्त समितीने दिलेली आहे. परकीय चलनाची अत्यंत चणचण असताना अशा तऱ्हेची उधळपट्टी ही विशेषच आक्षेपार्ह आहे.

परकीय सहकार्याच्या आधाराने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी असलेल्या वस्तूंचे उत्पादन करून निर्यात वाढेल आणि परकीय चलनाच्या मिळकतीत निव्वळ भर पडेल ही अपेक्षाही पूर्णपणे फसलेली आहे. त्याचे एक महत्त्वाचे कारण असे, की बऱ्याचशा करारनाम्यातून भारतीय कंपन्यांच्या निर्यातीवर नियंत्रक अटी लादलेल्या आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणी वाढत असूनही निर्यात करावयास त्यांना मोकळीक नाही. त्याबरोबरच, यंत्रसामग्री आणि आवश्यक त्या कच्च्या आणि माध्यमिक मालाची आयात मात्र संबंधित देशातूनच केली पाहिजे अशा अटीही करारनाम्यातून घातलेल्या आहेत. अशा आयातीकरता आंतरराष्ट्रीय किंमतीपेक्षा कितीतरी अधिक किंमत आपणाला अनेकदा मोजावी लागते.




**फक्त वीस हजार रुपये भांडवलावर सहा वर्षांत सात कोटी रुपये नफा अमेरिकेत गेला.**

तसेच परकीय भांडवलदारांना त्यांचे नफे, रॉयल्टीज, व्याज, परकीय तंत्रज्ञांच्या पगाराचा काही भाग परकीय चलनात द्यावा लागतो. नफ्यापोटी परकीय भागधारकांना बोनस शेअर्स देण्यात आले तर, परकीय चलनाची आयात न होताच परकीयांच्या भारतातील भांडवलाची किंमत मात्र वाढत रहाते आणि ह्या वाढत्या भांडवलावरील व्याजाच्या व नफ्याच्या बोजाचा परकीय चलनावरील ताणही वाढत जातो. परकीय भांडवलदारांनी आणलेल्या मूळ भांडवलाच्या कितीतरी पटींनी त्यांनी ह्या देशाचे आर्थिक शोषण केलेले आहे. उदाहरणार्थ, फायरस्टोन टायर अँड रबर कंपनी ऑफ इंडियाने मूळ भांडवल फक्त २०,००० रुपयांचे घालून केवळ सहा वर्षांच्या काळात जवळजवळ सात कोटी रुपयांचे परकीय चलन नफ्याच्या रूपाने अमेरिकेत नेले आहे. कोका कोला एक्स्पोर्ट कॉर्पोरेशनने केवळ सहा लाख रुपयांच्या मूळ भांडवलावर सहा कोटी रुपयांची रॉयल्टी, फी आणि नफा मिळविला आहे. कोलगेट कंपनीने तीन लाख रुपयांच्या भांडवलावर दोन कोटीच्या वर रुपयांचे परकीय चलन अमेरिकेस पाठविले आहे. १९४८ ते १९६१ या कालावधीमध्ये परकीयांशी करारनामे करून चालविलेल्या कारखान्यांमुळे ७१८·४ कोटी रुपयांचे परकीय चलन आपल्याला खर्च करावे लागले तर परकीय भांडवलदारांनी केलेल्या गुंतवणुकीमुळे आपल्याला २४७·१ कोटी रुपयांचे परकीय चलन मिळविता आले म्हणजेच ह्या तेरा वर्षांत मिळकतीच्या सुमारे तिप्पट परकीय चलन परकीय भांडवलदारांकरता खर्ची पडले असा अंदाज श्री. एम्. किद्रॉन यांनी आपल्या 'भारतातील परकीय भांडवलाची गुंतवणूक' ह्या इंग्रजी पुस्तकात बांधलेला आहे. (तक्ता क्र. २ पाहा).

ह्या संदर्भात, १९६०–६१ ते १९६५–६६ ह्या काळातील परकीय कंपन्यांच्या सहकार्याने चाललेल्या कंपन्यांच्या आयात-निर्यातीसंबंधीची दत्त समितीने दिलेली आकडेवारी विशेष उद्बोधक आहे (तक्ता क्र. २ पहा). जसजसा ह्या कंपन्यांच्या उत्पादनाचा पसारा वाढत चाललेला आहे तसतसा परकीय चलनाच्या स्वरूपात ह्या कंपन्यांवर होणारा निव्वळ खर्च दिवसेंदिवस वाढतच चाललेला आहे. हे ह्या तक्त्यावरून स्पष्ट होईल. ह्या सहा वर्षांत परकीय कंपन्यांसाठी भारतीय अर्थव्यवस्थेला १०६९·५ कोटी रुपयांचा निव्वळ खर्च परकीय चलनाच्या स्वरूपात करावा लागला.

औद्योगिक विकासाच्या नावाखाली भारतीय भांडवलदारांनी परकीय भांडवलदारांशी केलेल्या संगनमताची आपल्या अर्थव्यवस्थेला पैशाच्या स्वरूपात किती मोठी किंमत मोजावी लागत आहे. ह्याची कल्पनावरील विवेचनावरून येईल. परंतु

**तक्ता क्र. २** : औद्योगिक उत्पादन-क्षेत्रातील परकीय सहकार्याने चाललेल्या कंपन्यांचे उत्पादन, निर्यात व परकीय चलनाचा खर्च.

(आकडे कोटी रुपयात)

| वर्ष | एकूण उत्पादन | निर्यात | आयात | रॉयल्टी फी वगैरे | परकीय चलनातील एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १९६०–६१ | ७९३·४ | २६·८ | १५५·६ | १४·१ | १६९·७ |
| १९६१–६२ | ९०१·० | २८·४ | १६२·१ | १६·६ | १७८·७ |
| १९६२–६३ | १०५९·३ | २८·६ | १७१·२ | २०·३ | १९१·५ |
| १९६३–६४ | १२६६·६ | ३७·० | १८४·५ | १७·८ | २०२·३ |
| १९६४–६५ | १६१०·३ | ४३·८ | २१७·८ | २४·७ | २४२·५ |
| १९६५–६६ | १८४२·२ | ४९·५ | २७०·२ | २८·७ | २९८·९ |
| एकूण | ७४७२·८ | २१४·१ | ११६१·४ | १२२·२ | १२८३·६ |

प्रगल्भ अर्थव्यवस्थेशी जखडून टाकले गेल्याने भारतासारख्या मागास देशाच्या अर्थव्यवस्थेची फरपट होते आणि अर्थव्यवस्थेमध्ये पंगुत्व येते. ही किंमत दीर्घकालीन विचार करता अतिशय जबर अशी असते.

परकीय भांडवल आणि उत्पादनतंत्र यांच्या साहाय्याने घडून येणाऱ्या औद्योगीकरणामध्ये परदेशातील कारखान्यांबरहुकूम कारखाने हिंदुस्थानात सुरू करण्यावर भर दिला जातो. अशा कारखान्यांमधून परदेशांत ज्या वस्तूंचे उत्पादन होते त्याच वस्तूंचे उत्पादन एतद्देशीय बाजारपेठेचा विचार न करता केले जाते. त्यातही उत्पादनामध्ये वापरावयाचा कच्चा माल आणि सुटे भाग देशातल्या देशात उपलब्ध होतील का ह्याचा फारसा विचार न करता मालाचा दर्जा टिकविण्याच्या नावाखाली हा माल संबंधित देशातून आयात केला जातो आणि परकीय भांडवलप्रधान उत्पादनतंत्र अथपासून इतिपर्यंत जसेच्या तसे वापरले जाते. परंतु अशा मानवी श्रमाची बचत करणाऱ्या उत्पादनतंत्राचा भरपूर मनुष्यबळ उपलब्ध असलेल्या भारतासारख्या मागास देशामध्ये जसाच्या तसा अवलंब केल्याने मानवी श्रम हा उत्पादनामध्ये अनावश्यक होऊन आर्थिकदृष्ट्या लोकसंख्या अर्थव्यवस्थेला भारभूत होऊन बसते आणि सुधारित उत्पादनतंत्र हे अर्थव्यवस्थेचा अंगभूत भाग होऊ शकत नाही.

वास्तविक पहाता, कोणतेही उत्पादनतंत्र हे चांगले की वाईट हे परिस्थितीनुसार ठरत असते आणि अर्थव्यवस्थेतील उत्पादन घटकांच्या उपलब्धतेनुसार उत्पादनतंत्राची निवड करणे योग्य ठरते. उदाहरणार्थ, पिकांवर जंतुनाशके आणि कीटकनाशके फवारण्याकरता विविध तंत्रांचा अवलंब करणे शक्य आहे. हे काम हेलिकॉप्टरच्या साहाय्याने करता येईल, यांत्रिक पंप वापरून करता येईल किंवा साधे पंप वापरूनही करता येईल. हेलिकॉप्टरच्या साहाय्याने केले तर एकतर मनुष्यबळाला वाव नाही आणि दुसरे म्हणजे साधनसामग्रीकरताही परावलंबित्व पत्करावे लागले. देशातील मनुष्यबळाचा अधिकाधिक सुयोग्य वापर करण्याच्या दृष्टीने उत्पादनतंत्र निवडले तरच आपल्यासारख्या मागास देशांतील वाढती लोकसंख्या अर्थव्यवस्थेस भारभूत होणार नाही. अर्थात जसजसे अधिक भांडवल आपल्या देशात उपलब्ध होईल तसतसे थोडेफार भांडवलप्रधान तंत्र वापरण्यास प्रत्यवाय नाही. परंतु आज ज्या पद्धतीने परकीय भांडवलप्रधान उत्पादनतंत्राचा अवलंब आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थान मिळविण्याच्या आशेने आणि काही विशिष्ट गटांच्या हितसंबंधाच्या दृष्टीने केला जातो त्यामुळे मागास देशांतील बेकारीचा प्रश्न भयावह स्वरूप धारण करू लागलेला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळातच अशा तऱ्हेने येणाऱ्या बेकारीची चाहूल भारतामध्ये लागलेली आहे आणि त्यानंतरच्या काळामध्ये बेकारीचा प्रश्न उग्रतर होत चाललेला आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या परावलंबित्वाचा परिणाम आपल्या आंतरराष्ट्रीय


व्यापारसंबंधांवर फार मोठ्या प्रमाणात झालला दिसतो. स्वातंत्र्यपूर्वीच्या काळात आंतरराष्ट्रीय व्यापारात आपली अर्थव्यवस्था ब्रिटिश अर्थव्यवस्थेशी जखडली गेली होती. आजही, अमेरिका, इंग्लंड, सोव्हिएट रशिया आणि जपान ही चार राष्ट्रे आपल्या निर्यातीपैकी दोन तृतियांश माल खरेदी करतात आणि ह्या चार राष्ट्रांकडून आपण आपल्या आयातीपैकी जवळजवळ ७० टक्के आयात खरेदी करतो. आपली निर्यात बहुतांशी कच्च्या आणि अर्धसंस्कारित मालाच्या स्वरूपात आहे आणि माल विकण्यास अनेक स्पर्धक राष्ट्रे उत्सुक असल्याने आपल्याला पडाऊ किमतीत निर्यात करावी लागते. आपण मात्र ह्या देशांकडून आयात करीत असलेल्या यंत्रसामग्री, वाहतुकीची साधने आणि उत्पादनतंत्र ह्यावर आपला आर्थिक विकास अवलंबून ठेवलेला असल्याने ही आयात आपणास अत्यावश्यक असते. ह्यातील काही आयात करारनाम्यातील अटीनुसार बांधील असल्याने अधिकच चढाऊ किमतीत खरेदी करावी लागते. म्हणजेच वास्तविकदृष्ट्या हा आंतरराष्ट्रीय सौदा आपणास महागात पडतो.

परकीय भांडवलाच्या आयातीमुळे एतद्देशीय भांडवलावरील नफ्याचे प्रमाण थोडेफार कमी होण्याची शक्यता असते. परंतु भारतापेक्षाही मागासलेल्या देशात भांडवलाची निर्यात करणे जमले तर ते एतद्देशीय भांडवलदाराला फायद्याचे असते. ही वस्तुस्थिती ओळखून भारतातील भांडवलदारांनी, आपल्या देशात भांडवलाची एवढी टंचाई असूनही, मलेशिया, सुदान, इराक, अफगाणिस्तान नेपाळ ह्यांसारख्या अत्यंत मागासलेल्या देशात भांडवली गुंतवणुकी करावयास सुरुवात करून परकीय भांडवलदारांनी दिलेला धडा गिरविण्यास सुरुवात केलेली आहे. परिणामी देशातील भांडवलाची टंचाई अधिक तीव्र होत आहे आणि खाजगी नफ्याच्या कसोटीवर होणारी आपल्या देशातील भांडवल गुंतवणूक अधिक नफा देणाऱ्या चैनीच्या उत्पादनाकडे खेचली जाऊन सामान्य जनतेच्या नित्याच्या गरजांच्या उत्पादनाच्या क्षेत्रामध्ये भांडवलाची चणचण प्रकर्षाने वाढते.

## वाढते पंगुत्व

आपल्या अर्थव्यवस्थेतील पंगुत्व घालविण्याच्या दृष्टीने देशातील साधसामग्रीचा विचार करून सुयोग्य उत्पादनतंत्राचे संशोधन भारतीय शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ करू शकणार नाहीत का आणि जर करू शकत असतील तर ते का करीत नाहीत असा प्रश्न साहजिकच उभा राहतो.

अर्थव्यवस्थेतील वाढते पंगुत्व लक्षात घेऊन सरकार परकीय संगनमतावर योग्य ती नियंत्रणे का घालीत नाही असाही प्रश्न उभा राहतो. साध्या भोळ्या भारतीय राजकारण्यांना परकीय भांडवलदाराचे षडयंत्र कळत नाही, की स्वकीय आणि परकीय भांडवलदारांचा इतका जबरदस्त पगडा भारतीय सरकारवर आहे, की ज्यामुळे भारतीय जनतेचे हित-अहित कळत असूनही ते परकीय




**परदेशी तेवढे चांगले, अशा मोहिनीमंत्राची भूल आपल्यावर पडलेली आहे !**

भांडवलदारांची भलावणी करीत आहे ? की परदेशी तेवढे चांगले, अशा मोहिनीमंत्राची भूल आपल्यावर पडलेली आहे ? ह्या तिन्ही गोष्टी थोड्याफार प्रमाणात बरोबर आहेत. नाहीपेक्षा एकीकडे भारतामध्ये उत्पादनतंत्र उपलब्ध आहे अशा घोषणा केंद्र सरकारचा तंत्रविद्याविभाग करीत असताना दुसरीकडे त्याच सरकारची परवानायंत्रणा परकीय सहयोगांना मंजुरी देत आहे; अशा तऱ्हेचे जे दृश्य भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये खत-कारखाने, ट्रॅक्टर-कारखाने, वाहतुकीची साधने, सौंदर्यप्रसाधने ह्यासारख्या विविध क्षेत्रांतून दिसते ते दिसले नसते. परकीय उत्पादनतंत्र हे वरवर पाहता विनायास उपलब्ध होत असल्याने भारतीय तंत्रसंशोधनाची कसोटी पाहिली गेलेली नाही आणि एकदा उत्पादनतंत्र उपलब्ध झाले, की त्या क्षेत्रातील तंत्रसंशोधनाचे काम थंडावते. कोणत्याही क्षेत्रातील उत्पादनतंत्र-विभाग हा खर्चिक असतो आणि परकीयतंत्र वापरून त्या विभागात आपण बचत करीत आहोत असेही फसवे समर्थन प्रसंगवशात केले जाते.

प्रत्यक्षात मात्र आपल्याला परावलंबन आणि त्यापासून होणारे नुकसान हे अपरिहार्यपणे सतत सोसावे लागते. कारण, परकीय तंत्राचा भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये ज्या उद्योगात वापर केला जातो ते बहुतांशी केवळ भौगोलिक अर्थानेच भारतीय अर्थव्यवस्थेचा भाग मानले पाहिजेत, अशा उद्योगांचे आर्थिक सांधे संबंधित परकीय अर्थव्यवस्थेशी जुळविलेले असतात आणि हे उद्योगधंदे आर्थिक विकासाकरता– मूलभूत महत्त्वाचे असल्याने संबंध अर्थव्यवस्थाच अपंग होऊन परकीय अर्थव्यवस्थेशी जखडली जाते. अशा परिस्थितीत आर्थिक विकासाचा एतद्देशीय संदर्भ

सुटतो आणि संबंधित देशांच्या आर्थिक हितसंबंधानुसार मागास अर्थव्यवस्थेची फरपट होऊ लागते. देशाच्या आर्थिक विकासाच्या आणि सामान्य जनतेच्या उत्पन्नाच्या पातळीशी सपूर्णपणे विसंगत अशा योग्य वस्तूंची उत्पादनक्षेत्रे ही अधिक किफायतशीर म्हणून वाढीस लागतात आणि स्थानिक उच्चभ्रू वर्गाकडून पोसली जातात. अशा विकृत औद्योगीकरणाचे आणि आर्थिक वाढीचे एक भ्रामक पटल सबंध अर्थव्यवस्थेस वेढून टाकते. परंतु अशा अर्थव्यवस्थेत प्रगल्भ अर्थव्यवस्थेचा चतुरस्रपणाही नसतो आणि बदलत्या परिस्थितीनुसार उत्पादनाचा घाट बदलण्याचा सव्यसाचीपणाही नसतो. त्यामुळे परकीय मदतीवर अवलंबून राहणे सकृद्दर्शनी अटळ होऊन बसते.

सारांशाने सांगावयाचे झाल्यास, परकीय भांडवलाच्या आणि आपल्या अर्थव्यवस्थेशी विसंगत अशा परकीय उत्पादनतंत्राच्या आयातीमुळे भारतातील भांडवलशाहीचे मूळ अधिकच पक्के होऊन भारतीय अर्थव्यवस्था बड्या भांडवलशाही देशांच्या कोंडीत सापडलेली आहे. देशातील उत्पादन साधनसामग्रीचा आणि मनुष्यबळाचा विचार करून, सुयोग्य उत्पादनतंत्र वापरून स्वावलंबनाने नवे नवे उद्योगधंदे काढले पाहिजेत. हे उद्योगधंदे काढताना त्यामध्ये कोणत्या प्रकारचे कसब आणि तांत्रिक ज्ञान आपणाकडे उपलब्ध आहे ह्याचा विचार करून अधिकाधिक लोकांना उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याची, म्हणजेच रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे जितके आवश्यक आहे तितकेच ह्या उद्योगधंद्याची उभारणी देशातील सामान्य जनतेच्या गरजा पुरविण्याकरता आवश्यक असलेल्या वस्तूंच्या मागणीच्या भरभक्कम पायावर होणे आवश्यक आहे. ह्याकरता भारतीय अर्थव्यवस्था ही भारताच्या सामान्य जनतेकरता राबविली गेली पाहिजे. हे सूत्र मनाशी अगदी पक्के करून त्यानुसार अर्थव्यवस्थेची चौकट आखली आणि स्वावलंबन हा समाजसत्तावादी आर्थिक विकासाचा पाया समजून आर्थिक विकासाची झेप घेतली तरच आपल्या देशाच्या राजकीय स्वातंत्र्याला आर्थिक स्वातंत्र्याची जोड मिळून काही अर्थ प्राप्त होईल.



मुक्काम नागपूर

# सोहळा

प्रभाकर चाफेकर

गेल्या रविवारी नागपूरकरांनी पंडित भीमसेन जोशींचा केलेला सत्कार अनेक वर्षे नागपुरातील रसिक श्रोते विसरणार नाहीत. निव्वळ नागपूरकरच नव्हेत गोंदिया–तुमसर पुसद, पुलगाव इ. गावाहून भीमसेनजींचे चाहते मुद्दाम या सत्कारा-करता आले होते. या सत्काराकरता एक खास समिती स्थापन करण्यात आली होती आणि नागपुरातील प्रसिद्ध कायदेपंडित श्री. अरूण मनोहर या समितीत स्वागताध्यक्ष होते. याशिवाय विविध क्षेत्रातील नामवंत नागरिकांनीदेखील उत्स्फूर्त-पणे या सत्काराची योजना आखली होती. तरीहीपण या सत्कारामागची प्रेरणा मात्र खरोखरी स्वरसाधना संगीत समाजाच्या श्री. बाबासाहेब उत्तरताराची होती.

सत्काराकरता विदर्भ साहित्य संघाचे धनवटे रंगमंदीरदेखील लहान पडले असते म्हणून भगिनीमंडळाच्या प्रांगणात एक मंडप घालून खुले व्यासपीठ तयार करण्यात आले होते आणि नागपूरला आता त्रास देणाऱ्या सायंकालीन सूर्यकिर-णांच्या तिरीपीची पर्वा न करता हजारो रसिक सायंकाळी पांच पासूनच मंडपात

गर्दी करून बसले होते. पं. भीमसेनजी मंडपात आल्याबरोबर लोकांनी टाळ्यांच्या कडकडाटाने त्यांचे स्वागत केले.


सत्कार समारंभात भाषणांची गर्दी नव्हती. मोजकीच पण समर्पक भाषणे झाली. भीमसेनजींचे जुने स्नेही, नागपूरातील एक संगीतप्रेमी मर्मज्ञ श्री. मधुकर मंगरुळकर यांनी भीमसेनजींना आज मिळणाऱ्या यशामागच्या त्यांच्या खडतर तपाची जाणीव श्रोत्यांना करून दिलीच पण मैत्रीच्या हक्काने भीमसेनजींना वयोमानाप्रमाणे आता वेगाचे जीवन प्रकृतीस्वास्थ्याला अपायकारक होण्याची शक्यता असल्याने ते टाळावे, आवश्यक ती विश्रांती आणि नियमितपणा जीवनात कटाक्षाने आणावा अशी विनंतीवजा सूचना केली.

त्यानंतर महाराष्ट्रातले सुप्रसिद्ध नाटयदिग्दर्शक आणि लेखक श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी सत्काराचे अतिशय सुंदर आणि मार्मिक भाषण केले. आजच्या तरूणांना आंघोळीनंतर आरशात बघत केस विंचरताना 'लागली समाधी' गीत म्हणण्याची स्फूर्ती यावी याला कारण भीमसेनजींचा त्यांच्यावरील प्रभाव आहे हे सांगून आजच्या तरूण पिढीत शास्त्रीय गायनाची आवड निर्माण करण्याचे श्रेय बहुतांशी भीमसेनजींकडेच जाते असं ते म्हणाले. श्रीमती लता मंगेशकर, भीमसेन जोशी आणि कुमार गंधर्व या महाराष्ट्राने भारताच्या सांस्कृतिक प्रगतीकरता दिलेल्या तीन देणग्या आहेत हे सांगून मास्तरांनी (श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर) एका सुंदर दृष्टान्ताच्या उपयोगाने तिघांच्याही कार्याचा गुणगौरव केला. शास्त्रीय संगीताचा सागर एखाद्या छोटयाशा कलशात आणून सर्व मर्म त्या कलशातील जलात आणण्याची किमया लताबाईंची, कलशातील सागर श्रोत्यांपुढे मांडून दाखवण्याची किमया भीमसेनजींची तर कलशा-आतील सागर आणि बाहेरचा सागर एकरूप करून दाखवण्याचे कौशल्य कुमारगंधर्वांचे असं ते म्हणाले. गुरुकृपेने यशश्री आणि भाग्यश्री ज्या थोर कलावंताला लाभली आहे आणि जनतेने आधीच मन:पूर्वक ज्यांना सुरश्री एवढी दिली आहे त्या पंडित भीमसेन जोशींना पद्मश्री किताब मिळणे हा त्या किताबाचा—त्या पदवीचा मान आहे असं ते म्हणाले. सुरांना हवे तसे वाकवून चांगल्या अर्थाने श्रोत्यांच्या कानावर ताबा मिळवणाऱ्या या महान कलावंताने दिलेल्या आनंदाबद्दल कृतज्ञता व्यक्त न केल्यास तो आपला कृतघ्नपणा ठरेल असंही ते शेवटी म्हणाले. पंडितजींच्या गायनातल्या माधुर्य ओज व प्रसादाचाही त्यांनी उल्लेख केला.

श्रेष्ठ आणि जेष्ठ साहित्यिक आणि पत्रकार श्री. ग. त्र्यं. उर्फ भाऊसाहेब माडखोलकरांनी या कलावंतावर प्रेम करणाऱ्या कै. बाबूरावजी देशमुखांच्या भीमसेनजींबद्दल त्यांना वाटणाऱ्या कौतुकाच्या स्मृती सांगून रथसप्तमीला जन्मलेल्या या कलावंताच्या कलेत रथसप्तमीनंतरच्या तेजोनिधी सूर्याचे ओज प्रकट व्हावे व त्यांना सुखाचे दीर्घायुष्य लाभावे अशा आशीर्वादपर शुभेच्छा व्यक्त केल्या.

पंडितजींना व सौ. वत्सलाबाई जोशी यांना सत्कारदर्शक शाल व उपहार देण्यात आल्यावर अनेक संस्थांनी आणि व्यक्तींनी भीमसेनजींना पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले. गायन जरी अवघड वाटले नाही तरी भाषण करणे फार अवघड आहे आणि त्यातही ज्या नागपुरात आपल्या गुरूंचे काही काल वास्तव्य होते आणि नागपूरने आपल्या गुरूजींवर व आपल्यावर सतत प्रेमाचा वर्षावच केला. त्यांनी केलेल्या सत्कारप्रसंगी बोलणे फार कठीण आहे. असे भीमसेन जोशी प्रथम म्हणाले. कालानुरूप नवीन काळात गायन आकर्षक करण्याकरता जे जे चांगले इतर घराण्यातही असेल ते घ्यावे असे आपल्याला वाटते असे सांगून निव्वळ किराणा घराण्याचीच गायकी आपण गातो असे म्हणणे बरोबर नाही. असं ते म्हणाले. पदम्श्रीपेक्षाही लोकांनी केलेल्या प्रेमाचा छोटासा समारंभही जास्त महत्त्वाचा मला वाटतो असंही ते म्हणाले. नागपूरकरांबद्दल त्यांनी कृतज्ञताही व्यक्त केली.

पंडितजींवर नागपूरकरांचे अपार प्रेम आहे. साधारणतः त्यांची एकही मैफल नागपुरात अयशस्वी ठरली नाही. सुरांशी तन्मय होऊन सच्चेपणाने गाणाऱ्या पं. भीमसेनजींनी श्रोत्यांना अपूर्व अशा सात्विक आनंदाचे क्षण देऊन त्यांना फार वरच्या पातळीवर अनेकदा नेऊन किंचित काल का होईना समाधी अवस्थेच्या अनुपम सुखाची प्रचीती आणून दिली आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये. अनेक श्रेष्ठ गायक-वादक नागपुरात येतात दाद घेऊनही जातात. पण भीमसेन ते भीमसेन ! त्यांच्या मैफिलीला विलक्षण गर्दी श्रोते करतात. अशा दिव्य आनंद देणाऱ्या श्रेष्ठ कलावंताबद्दल त्यांना मिळालेल्या ‘ पदमश्री ’ किताबाच्या निमित्ताने का होईना पण मुद्दाम समारंभपूर्वक आदर व्यक्त न करणे कृतघ्नपणाचे ठरले असते.



शरद गोखले



# तुम्हावरी जीव माझा जडला !

## ग्रामीण नाटकाचा एक नमुना

पुण्या-मुंबईच्या प्रेक्षकांसमोर येणारी नाटके ही प्रामुख्याने शहरी सुशिक्षित प्रेक्षकांसाठी असतात. स्वाभाविकपणे त्यांची झेप ज्याला खऱ्या अर्थाने ग्रामीण म्हणता येईल, अशा भागापर्यंत पोचू शकत नाही. त्यांना हवा असलेला प्रेक्षक तिथे मिळणे कठीण असते आणि तिथे असलेल्या प्रेक्षकाला समजेल असे देणे त्यांना कठीण पडते. शिवाय नेपथ्य–प्रकाशयोजनेचे शहरी तंत्रही त्रासदायक ठरते. मग ग्रामीण भागातील प्रेक्षकांसमोर जाणारी कलाकृती असते तरी कशी ? या प्रश्नाचे उत्तर 'तुम्हावरीं जीव माझा जडला' या नाटयप्रयोगाचे वेळी अचूक मिळाले.

वाचकांना कथा वगैरे सांगण्याच्या भरीस न पडता मी फक्त प्रमुख पात्रांच्या, त्यांच्या वैशिष्टयांसह नोंदी करतो.

तात्याबा–वृद्ध पुत्रहीन पाटील.

बाजीराव–तात्याबा पाटलांचा जवान पुतण्या (हीरो).

गंगाराम–पाटलांनाही पैसे पुरवणारा रंगेल सावकार. (व्हिलन)

विष्णुपंत–बाजीरावाचा चमचा. (रिलीफ)

गणपत गुरव–सावकाराचा चमचा. (रिलीफ)

मेनका–तमासगिरीण. (रोमान्स)

आता पात्रांच्या अशा नोंदी दिल्यावर अनेक मराठी ग्रामीण चित्रपट पाहिलेल्या वाचकांना वरील नोंदीवरून कथानक सहज जुळवता येईल आणि असे जुळवलेले कथानक जसे असेल, अगदी तसेच कथानक प्रत्यक्षात घडते. कारण या पात्रवैशिष्टयांची पाचर अशी जबरदस्त आहे, की कथानकाला आखीव चौकट सोडून बाहेर पडणे अशक्य व्हावे. तर वाचकांनी योजल्याप्रमाणेच कथानक घडून अखेर बाजीरावाचे व मेनकेचे मेतकूट जमते.

आता असा हा ग्रामीण भागाचा मसाला असल्यावर त्याला मंडळीही तशाच जबरदस्त ताकदीची हवीत. नाव असलेले चार कलाकार एकत्र आणण्यात सूत्रधार

टाकळकर यांनी यश मिळवले आहे. बाजीराव (सूर्यकांत), गंगाराम (राजशेखर) मेनका (संजीवनी बिडकर) व गुरव (बाळ गोसावी) या खेरीज दिग्दर्शक बी. माजनाळकर विष्णुपंतांची भूमिका करतात. या पद्धतीच्या भूमिका अनेक वेळा केल्या असल्याने सर्व मंडळी आपापल्या भूमिका सफाईने करतात. तथापि या नाटकाचे खरे आकर्षण आहे संजीवनी बिडकर यांची ढंगदार नृत्ये आणि मा. दा. देवकाते यांच्या ढंगदार लावण्या, बाईच्या ठसकेबाज नृत्याला सुरेल्या चालीत विरघलेल्या लावण्यांची जोड मिळाल्याने नृत्याचा हा भाग झकास वाटतो. तुम्हावरी जीव माझा जडला ही 'टायटल लावणी' छान रंगते. नाटक हे प्रामुख्याने ग्रामीण भागासाठी असल्याने नेपथ्याची बाज भलतीच आटोपशीर, चटकन् कुठेही प्रयोग नेता यावा अशा पद्धतीची. एक प्लेन पडदा, एक जंगलातील देवळाचा पडदा, तात्या पाटलाच्या घराचा एक पडदा, आणि विष्णुपंताच्य घराचा एक पडदा–असं हे सगळं पडद्यांचं राज्य. पूर्वी हे शिट्टीवर चाले, आता अंतस्थ खाणाखुणांनी चालतं इतकाच फरक.

नेपथ्याच्या चार वळकटचा काखोटीला मारल्या आणि कलाकारांच्या तारखा मिळवल्या, की कोणत्याही आडगावी प्रयोग करायला मंडळी मोकळी. ¤

# राजकारण गेलं चुलीत !

'वरचा मजला रिकामा' नावाचं एक हलकं फुलकं नाटक आत्माराम सावंत यांनी दिलं होतं. राजकारण गेलं चुलीत हे त्यांचं दुसरं नाटक. भ्रष्टाचारी राजकीय जीवनावर विडंबनात्मक पद्धतीने, टीका करणारी ही त्यांची कलाकृती दत्ता भट यांच्या 'गरिबी हटाव' या नाटकाच्याच जातकुळीतली. नाटक आणि नाट्यतंत्र यांचा फारसा विचार न करता सूक्ष्म निरिक्षणाने सभोवतालच्या घटनांचा वेध घ्यायचा आणि या घटनांची दखल घेणारे कथानक संवादबद्ध करून प्रेक्षकांसमोर आणायचे. स्वाभाविकपणेच जे चौफेर दिसेल, त्याचं मार्मिक बोचरं दर्शन प्रेक्षकाला संतोष देऊन जातं.

भाऊसाहेब कऱ्हाडकर हे एक तसं प्रस्थच. स्वतः सत्तास्थानांपासून दूर असले, तरी सत्तास्थानाचं मानकरी कुणाला करावं, याचे निर्णय घेण्याची शक्ती असलेला हा नेता या नाटकाचा नायक. त्याच्या राजकीय जीवनात येणारी–प्रेक्षकांना अवतीभवती दिसावीत, अशी अनेक मंडळी. त्याचे कौटुंबिक जीवन, आणि उतार वयात हाती कोवळे पाखरू मिळाल्याने भरकटलेले व्यक्तिगत जीवन यांचे तपशील-वार दर्शन हे नाटक घडवते. नाट्यतंत्राच्या दृष्टीने लेखन फारसे दर्जेदार नसले, तरी

कथानक गतिमान ठेवून, आणि आकर्षक संवादांची जोड देऊन आत्माराम सावंत यांनी प्रेक्षणीय प्रयोगाची तरतूद करून ठेवली आहे. तथापि प्रकर्षाने जाणवणारा दोष म्हणून भाऊसाहेब ज्या पातळीवरील राजकीय नेता दाखवत आहेत, त्या पातळीवरील नेता इतक्या भंपकपणे वागेल हे पटत नाही. झोपडपट्टीवासीयांना त्याने लिहिलेले पत्र, आणि अपरिचित मृत कलाकाराला त्याने वाहिलेली श्रद्धांजली-त्याच्या चातुर्याची चुणूक दाखवतात. असा हा मनुष्य एका मुलीकडून इतक्या सहजीसहजी बनवला जाईल हे पटत नाही. शिवाय या पातळीवरील मनुष्य राजकारणाआड कोणतीही गोष्ट येणार नाही. याची दक्षता निश्चित घेईल. त्यामुळेच प्रांताचे मुख्यमंत्रीपद आणि एका जवान मुलीचा सहवास यात अशी व्यक्ती एकतर संघर्ष येऊ देणार नाही. आणि समजा असा संघर्ष निर्माण झाला तर मुलीचा चटकन् बळी देऊन राजकीय बैठक भक्कम करील. राष्ट्रीय पातळीवर पक्षाचे काम करणारा गणपती शंकर सावंत यांनी अकारण भंपक केले आहे. या गणपती शंकरची वागणूक तर मुळीच पटणार नाही. लिखाणातील ही अतिशयोक्ती लेखनाच्या दृष्टीने तापदायक वाटते.

सावंत यांची ही कलाकृती रविराज मुंबई या संस्थेने मोठ्या थाटात रंगभूमीवर आणली आहे. फक्कड निर्मिती आणि शरद तळवलकर (भाऊसाहेब) व नीलम (कांचनगौरी दादरकर) यासारखे समर्थ कलावंत असल्याने प्रयोग पुष्कळच बहारदार होतो. भाऊसाहेबाच्या घराचा देखावा छान उभा केला होता. या सुडौल नेपथ्याचा वापरही चांगला केला गेला. प्रयोगाचे दिग्दर्शक सुहास भालेकर यांनी भ्रष्ट, लोचट आणि सत्तेसाठी चटावलेल्या झेड्. पी. वाल्याची भूमिका छान केली. राणे यांनी काहीसा लाचार आश्रित पत्रकारही अचूक उभा केला. शशिकांत निकते यांची भाऊसाहेबांच्या मुलाची भूमिका अत्यंत सामान्य वाटली. या भूमिकेसाठी इतक्या घाणेरड्या लकबी आणि संवादफेकीची गचाळ स्टाईल त्यांनी का उचलावी हेच समजत नाही. मिस्किल महत्वाकांक्षी कांचनमालेचे काम नीलम या जुन्या नटीने विलक्षण रंगवले. शरद तळवळकरांचा भाऊसाहेबही त्यांच्या सहजसुंदर अभिनयाने लक्षात राहण्याइतका चांगला वाटला.

सुहास भालेकर यांनी प्रयोग नेटकेपणाने बसवला. भाऊसाहेबांसारख्या पुढाऱ्याला कांचन किती सहजतेने नाचवते. याचे मार्मिक दर्शन कांचन भाऊसाहेबांना हॉटेल-मध्ये दांडीवरील आपला ब्लाऊज खाली काढायला सांगते तेव्हा पहावयास मिळते. कांचनचे व गुलाबचे प्रवेशही त्यांनी छान बसवले आहेत. लहान भूमिका करणाऱ्या कलाकाराकडूनही कसूर होणार नाही याची त्यांनी दक्षता घेतली आहे.

विद्यमान राजकीय सामाजिक परिस्थितीवर, त्यातील दोषांवर, खोट्या ढोंगावर अचूक बोट ठेवून त्याचे मार्मिक दर्शन प्रेक्षकांना घडवणारी ही कलाकृती बऱ्यापैकी यशस्वी होण्यास प्रत्यवाय नसावा.

□ □ □

रसिक **चित्रपट**

# जन्म हा तुजसाठी

## रंगीत असून रंगहीन

मराठी चित्रपटांची एकंदर आर्थिक अवस्था पाहिल्यावर कोणी नवीन निर्माता विशेषत: या व्यवसायाशी अपरिचित असलेला अमराठी निर्माता या व्यवसायाकडे आकृष्ट होईल, असे कोणी सांगता तर पटले नसते. परंतु मराठी मुलखामध्ये मोटार व्यवसायामध्ये बक्कल पैसा संपादन केलेल्या एका सरदारजीने पहिला चित्रपट मराठी आणि तोही आरवो कलरमध्ये काढण्याचे ठरवले आणि 'जन्म हा तुजसाठी' सेटवर गेले.

प्रामुख्याने काव्याच्या प्रांतात वावरणारे श्री. देवकाते यांची कथा घेतली. कथा-वाल्याच्याच गळयात 'पटकथा संवाद गीते'–अशी बिरुदावली लटकवण्यात आली. आणि एक संथ, कृत्रीम कथानक, संथ कंटाळवाण्या लयीमध्ये रुपेरी पडद्यावर साकार झाले.

बाई बाटलीच्या नादाने नादावलेले आबासाहेब संपन्न संसार धुळीला मिळवतात. दिवाकर आणि आशा या मुलांची जबाबदारी आईवर येऊन पडते. दिवाकर मोठा झाल्यावर त्याच्या वडिलांनी स्थापन केलेल्या कंपनीमध्येच मॅनेजर म्हणून रुजू होतो. आबासाहेआंच्याच घरी लहानाचा मोठा झालेल्या विजूचे आशाशी लग्न व्हावे, अशी दिवाकरची व आईची इच्छा असते. ते दोघेही एकमेकांवर खुष असतात. वास्तविक सर्व सुरळीत व्हायचे पण अचानक एक मारवाडी सावकार दिवाकरच्या वडिलांनी घेतलेल्या पैशापोटी दिवाकरच्या घरावर जप्ती आणतो. या धक्क्याने आई मरते. दिवाकरला जरा बरे वाटावे म्हणून कंपनीचे संचालक त्याला कंपनीच्या कामाचे निमित्ताने गोव्याला पाठवतात. बाई-बाटलीचा नाद घेऊनच दिवाकर घरी येतो. दिवाकर, आशा, विजू– सर्वांची खूपखूप परवड होते. दिवाकरचा जीव वाचवण्या-साठी आशा चंद्रकला या नाचणारणीला घरामध्ये आपली वहिनी म्हणून आणते. चंद्रकलेच्या आईच्याअटीप्रमाणे स्वत: कोठीवर नाचण्यासाठी जाते. अत्याचार करू पाहणाऱ्या शेठजीचा खून केल्याचा आरोप आशावर येतो. फुसके रहस्य उलगडले

जाते. आणि अखेर विजू आणि आशा यांचे मीलन होऊन गोडगोड शेवट होतो.

दिग्दर्शक-संकलक व्ही. एस्. राव यांनी चित्रपटामध्ये जीव भरण्याचा कोठेही प्रयत्न केल्याचे जाणवत नाही. सरळ धोपटमार्गी पद्धतीने त्यांनी कथा सांगितली आहे. कथेला स्वतःची लय नाही. अथवा एकही प्रसंग मनाला भिडत नाही. त्यामुळे रंगीत असूनही चित्रपट निष्प्राण वाटतो.

मराठी चित्रपटामध्ये सर्वसाधारणपणे आढळणार नाहीत, इतके चांगले सेटस् कलादिग्दर्शक एच्. सोळंखी यांनी दिले आहेत. विश्वास साळुंके यांचे छायाचित्रण ही त्यांच्या कौशल्याची साक्ष देणारे आहे. अनेक शॉटस्-विशेषतः नृत्याचे वेळचे-त्यांनी हिंदी चित्रपटाच्यां तोडीचे घेतले आहेत. तथापि इतके असूनही चित्रपट निराशा करतो.

## संजीवनी बिडकर-मधू कडू

रमेश देव (दिवाकर) व उमा (आशा) या प्रमुख कलावंतांनी भूमिका ठीक केल्या आहेत. तथापि उमा कित्येक वेळा अगदीच नॉन सिनेमॅटिक दिसते. रमेश-उमापेक्षाही चंद्रकलाची भूमिका करणाऱ्या संजीवनी बिडकर जास्त प्रभावी ठरतात. तसेच छोटया शिपायाच्या भूमिकेमध्ये मधू कडू छान रग भरतो.

देवकाते यांची उत्तम गीते, एन्. दत्ता यांनी चढवलेला आकर्षक व रसपरिपोषक संगीत साज आणि गीतांचे पुष्कळच समाधानकारक चित्रण, ही चित्रपटाची महत्त्वाची जमेची बाजू आहे.

'तुझ्या रुपाने वसंत आला.' 'तोडून सारे बांध जगाचे,' आणि 'शूर वीरांचे कार्य कोणते, धर्म असे कोणता अर्जुना ऐक आता गीता,'-या गीतांचा या दृष्टीने अवश्य उल्लेख केला पाहिजे. खर्च करण्याची ताकद असलेला निर्माता लाभूनही उत्तम कलाकृती पहावयास मिळू नये याची "जन्म हा तुजसाठी" पाहिल्यावर जरूर हुरहुर लागून राहिली-

□ □ □



 पृष्ठ ७ वरून

ते एक तात्कालिक कारण जरूर होते, पण त्याबरोबरच गेली काही वर्षे धुमसत असलेल्या परिस्थितीने पेट घेतला, हेही तितकेच खरे. शासन व काँग्रेस संघटनेत सत्तास्पर्धेच्या राजकारणासाठी गटबाजी नेहमीच चालत आलेली आहे. त्यामुळे अनेकदा ध्येयवादी, प्रामाणिक कार्यकर्ते बाजूला राहून स्वतःच्या गटासाठी पारड्यात वजन टाकतील असे आपले लोक गोळा करण्याचा उद्योग सतत होत आला आहे. बंडखोरी महाराष्ट्राच्या जवळजवळ साऱ्याच जिल्ह्यात दिसून आली. जिल्ह्याजिल्ह्यात हे प्रमाण कमी-जास्त होते एवढेच. मातबर अशा अधिकृत उमेदवारांना पाडून एवढ्या मोठ्या संख्येने बंडखोर निवडून येतात याचा अर्थच सरळ आहे, की महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीने तिकिटे वाटताना पक्षपात केला. दुसरे म्हणजे इंदिरा लाट सर्वत्र जबरदस्त असतानाही हे उमेदवार निवडून आले, याचा अर्थ त्यांचे त्या विभागात कामही चांगले असावे आणि लोकांनाही ते आपले उमेदवार म्हणून मान्य असावेत.

हे सारे उमेदवार साखरी समाजवादी असल्याने 'पैसे पेरणी' करून निवडून आले असे म्हटले, तर त्यातही काही फारसे तथ्य दिसत नाही. कारण शिर्डी–कोपरगाव मतदार संघातून निवडून आलेले श्री. शंकरराव कोल्हे यांचाच काय तो साखर कारखानदारीशी संबंध आहे. पण यातही गम्मत अशी, की काँग्रेसचे अधिकृत (पडेल) उमेदवार श्री. रोहमारे हे स्वतः साखर कारखानदारच असून त्यांचे या व्यवसायातील प्रस्थ श्री. कोल्हे यांच्यापेक्षा फारच मोठे आहे. तेव्हा त्या मतदार संघात मोठा व छोटा असे दोन मासे एकमेकांना गिळू पहात होते पण शेवटी लहान माशानेच मोठ्या माशाला गिळले.

कोल्हापूर जिल्ह्यात जास्तच ठिकाणी बंडखोरी होती. पण पक्षश्रेष्ठींनी ती दडपण्याचा प्रयत्न केला तरीही ती पाच ठिकाणी जबरदस्तच होती.

काही जणांना कोल्हापूरकडे तिकिटे देण्यात येतील अशी खुद्द श्री. यशवंतराव चव्हाण यांनीच आश्वासने दिली होती. पण त्या आश्वासनांना प्रदेश काँग्रेसने हरताळ फासला. काही ठिकाणी तर आकसाने तिकिटे देण्यात आली नाहीत. उदा. कागलचे तरुण व क्रियाशील आमदार श्री. सदाशिवराव मंडलीक यांनी व त्यांच्यासारख्या इतर तरुण कार्यकर्त्यांनी राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीच्या वेळी गिरींची बाजू उचलून धरली. त्यानंतर श्री. आनंदराव चव्हाण व श्री. तुळशीदास जाधव यांना बोलवून कोल्हापुरात पहिल्या फोरमची स्थापना केली आणि पक्षश्रेष्ठींनी हा आकस ठेवून त्यांना तिकीट दिले नाही. काँग्रेसच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारासाठी गेलेल्या श्री. यशवंतराव चव्हाणांनीही श्री. मंडलीक यांच्या कार्याची

मुक्तकंठाने स्तुती केल्याचे वर्तमानपत्रांतही आले होते. पण चव्हाणांनी प्रशस्तिपत्र दिलेल्या अशा या चांगल्या कार्यकर्त्यालाही डावलण्यात आले. तरीही कार्याच्या जोरावर ते निवडून येऊ शकले. तरुण कार्यकर्त्यांचा एक मोठा संचच त्यांनी तयार केला आहे.

कोरेगाव मतदार संघात चुरशीचा सामना झाला. तेथे इतर सर्वांना डावलून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष श्री. वसंतदादा पाटील यांचे मेहुणे श्री. फाळके यांना तिकीट देण्यात आले. त्यामुळे बाहेरचा उमेदवार आमच्यावर लादला अशी लोकात भावना निर्माण झाली. आणि श्री. बर्गे यांना उभे रहाण्याचा आग्रह करण्यात आला. श्री. फाळके हे श्री. पाटील यांचे मेहुणे म्हणूनच त्यांना तिकीट मिळाले यात वादच नाही. प्रचारसभात श्री. फाळके सांगायचे, की त्यांच्याविरुद्ध उमेदवार उभाच करायचा होता तर तो त्यांच्यासारखा सुविद्य तरी पाहिजे होता. श्री. बर्गे यांच्यासारखा अशिक्षित काय कामाचा! पण शेवटी श्री. बर्गे यांनीच त्यांचा निकाल लावला. श्री. बर्गे हे मिस्किल गृहस्थ असावेत असे दिसते. प्रचार-सभेत ते सांगायचे, "हा उमेदवार (म्हणजे त्यांच्या विरुद्ध उभे असलेले श्री. फाळके) बाईचा (इंदिराबाईचा) नाही, गाईचा (काँग्रेसचा) नाही हा ताईचा (श्री., वसंतदादा पाटील यांच्या सौभाग्यवती शालिनीबाई यांचा) उमेदवार आहे."

पूर्वी प्रजासमाजवादी पक्षात असलेले व श्री. अशोक मेहतांबरोबर काँग्रेस प्रवेश केलेले श्री. केशवराव शिंदे-पाटील यांना ६७ सालीच तिकीट देण्यात यावे अशी कार्यकर्त्यांची मागणी होती पण नुकताच (६४ साली) काँग्रेस प्रवेश केला असल्याने त्यांना तिकीट नाकारले. कार्य करून मगच तिकीट देऊ या विचाराने यावेळी त्यांच्यासारख्या कार्यकर्त्यालाही तिकीट नाकारण्यात आले त्यामुळे खटाव (सातारा) येथील कार्यकर्त्यांनी त्यांनी उभे राहिलेच पाहिजे असा आग्रह धरला. काँग्रेसच्या गटबाजीविरुद्ध त्यांनी ६७ सालापासूनच आवाज उठवायला सुरुवात केली होती.

महाराष्ट्रात बंडखोर निवडून आले आणि त्याचा परिणाम असा झाला, की त्यांच्या मागोमाग इतर अनेक लोक आता बंडखोरी करण्याच्या दृष्टीने धीट झाले आहेत. विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने राज्य पातळीवर ही बंडखोरी झाली आता जिल्हा परिषदांच्या निवडणुकीच्या निमित्ताने ती जिल्हा पातळीवर संघटित होऊ लागली आहे. विधानसभा निवडणुकीत बंडखोरी बिलकूल संघटित नव्हती. पण आता हे सर्व आमदार एकत्र आल्यापासून याला संघटित स्वरूप देण्याचे प्रयत्न चालू झाले आहेत. राज्यसभेची जागा लढवून ती मिळविण्याचेही प्रयत्न चालू आहेत. जिल्हा पातळीवर लोक काँग्रेसकडे तिकीट मागायला जायला राजी नाहीत. याच मार्गाने जावे असा विचार अनेक ठिकाणी बळावतो आहे. यामुळेच जिल्हा परिषद निवडणुकांत भरघोस यश मिळेल अशी आशा अनेकांना वाटते.

म्हणजे या बंडखोरीचे संघटित स्वरूप सर्वच पातळयांवर दिसू लागणार अशी चिन्हे दिसत आहेत. आघाडीचा १६ कलमी कार्यक्रम असून तोच कार्यक्रम घेऊन जिल्हा पातळीवर नवे नेतृत्व उभे करण्याचा प्रयत्न होणार आहे. ज्या जिल्ह्यात बंडखोरी अधिक त्यावर अधिक भर दिला जाईल. काहीना काही कारणामुळे नाराज असलेले हे लोक अजूनही इंदिरा गांधींचे नेतृत्व मानतात. इंदिरा गांधींच्या कार्यक्रमावर विश्वास ठेवतात. त्यामुळे प्रश्न पडतो तो हा, की कॉंग्रेसने काही आमिषे पुढे ठेवली तर हे कॉंग्रेसमध्ये परत जाणार का? याला या आघाडीचे नेते नाही असे उत्तर देतात. आता विरोधक अशी पुस्ती जोडतात. पण याबरोबरच एक गोष्ट सांगितली जाते ती अशी, की सारे लोक इंदिरा गांधी यांच्या धोरणाला साथ देत आले, एका विशिष्ट परिस्थितीत त्यांना बंडखोरी करायला लागली. ही बंडखोरी महाराष्ट्रातील नेतृत्वाविरुद्ध होती. तेव्हा लोकांनी दिलेला कौल विचारात घेऊन नेतृत्वानेच आपल्या धोरणात बदल का करू नये आणि लोकांच्या आशा-आकांक्षांना मूर्त स्वरूप देण्यासाठी अधिक पुरोगामी का होऊ नये? असे झाले आणि हा बदल विचारात घेऊन त्यांना निवडून देणाऱ्या मतदारांनीच बंडखोरांना त्यांच्या भूमिकेत बदल करा असे सांगितले, तर मात्र त्यादृष्टीने विचार केला जाईल.

विरोधी पक्षाशी समझौता करायची या आघाडीची तयारी आहे पण त्यांच्याशीं आघाडी करण्याची तयारी नाही. कारण अपक्ष म्हणून काम करू असे मतदारांना आश्वासन दिले आहे.

बंडखोरांच्या विचारांची नोंद दिल्लीतही घेतली जाईल असा प्रयत्न आघाडी करते आहे.

बंडखोरांची 'लोकशाही समाजवादी आघाडी' आपली प्रतिमा कशी काय निर्माण करते ते लवकरच दिसेल. पण श्री. शंकरराव कोल्हे यांच्यासारखे काही जण आघाडीत विशेष रस घेताना आढळत नाहीत एवढेच खरे.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 50 Paise Regd. No. MH 649

सर्व पढिक तत्वज्ञान जीवनातील समर प्रसंगाना स्वत्वाचे भान ठेवून तोंड देण्याला पुरेसे नाही. अशा वेळी कलाकाराच्या जीवनाकडे पाहून वाटू लागते की सामाजिक तत्वनिष्ठांची पोथी पुराणे न मानताही उमर खय्यामप्रमाणे तो जीवनाचा संप्रदायविहीन पुजारी बनू शकतो. जागीरदारांच्या निवेदनातून मधून मधून हळूच डोकावणारा हा उमर खय्याम मोठा विलोभनीय आहे.

अच्युतराव पटवर्धन

# संध्याकाळ

एक
वेधक
आत्मकथन

गजानन
जागीरदार

राजहंस
प्रकाशन

मूल्य
दहा रुपये